# १४ वा केंद्रीय  वित्त आयोग

भारतीय राज्य घटनेतील ७३ व्या घटना दुरुस्ती अन्वये, वित्त आयोगाची स्थापना झाली आहे. पंचायत राज संस्थांना अधिक सक्षम बनविण्यासाठी, सत्तेचे विकेंद्रीकरण, अधिकार व जबाबदा-यांच्या प्रदानाची आवश्यकता उध्दत केली आहे. प्रभावी विकेंद्रीकरण करतांना केंद्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे अधिकारांचे हस्तांतरण (devolution), पारदर्शकता आणि सहभागी दृष्टीकोन यांचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. त्याकरीता समाजातील विविध घटक जसे शेतकरी, महिला, युवक, अनुसूचित जाती /जमाती, इत्यादींचा संपूर्ण प्रक्रियेमध्ये सहभाग असणे आवश्यक आहे.

**योजनेची संक्षिप्त माहिती :-**

१४ वा वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणारा निधी हा केवळ ग्रामपंचायत स्तरासाठीच उपलब्ध होणार आहे.  सदर आयोगाचा कालखंड दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० असा आहे. १४ वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायतीची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषानुसार निधी वितरीत होत असून जिल्हा परिषद कोल्हापूरला प्राप्त होणारा निधी ग्रामपंचायतींनी १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत उघडणेत आलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यावर RTGS प्रणालीव्दारे १००% वर्ग होत आहे.

**योजनेचे निकष व अटी शर्ती:-**

१४ वा वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा जनरल बेसिक ग्रँट निधी हा सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या व  ग्रामीण क्षेत्रफळ या निकषानुसार व परफॉर्मन्स ग्रँटचा निधी हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ अखेर पूर्ण करणे आवश्यक अशा ग्रामपंचायतीना ८० गुण व ग्रामपचांयतीने  स्वउत्पन्नात मागील वर्षापेक्षा वाढ होणे आवश्यक अशा ग्रामपंचायतीना २० गुण अशी एकूण १०० गुणापैकी  ८५ गुण प्राप्त करतील अशा ग्रामपंचायतीना लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषानुसार निधी वितरीत करणेत येत आहे.

**योजनेचे फायदे:-**

१. १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत १००% निधी थेट ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध होणार असलेने ग्रामपंचायतीस निधी तात्काळ उपलब्ध होऊन त्या अंतर्गत ग्रामपंचायतीच्या गरजेनुसार व प्राधान्यक्रमानुसार विविध विकास कामे हाती घेऊन पूर्ण करणे शक्य होईल.

२. सदरचा निधी हा लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया पूर्ण करुन गावसभेची अंतीम मान्यतेनंतर कामांची निवड होऊन ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेत आलेला आहे. त्या अनुषंगाने प्राधान्यक्रमानुसार गाव विकासाची कामे ग्रामपंचायत स्तरावरच पूर्ण होऊन निधी खर्च देखील ग्रामपंचायत स्तरावर होत असलेने निधी उपलब्ध होणेसाठी गावास विविध शासकिय विभागांकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.

३. सदर योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर ५ वर्षांमध्ये निधी उपलब्ध होऊन गावस्तरावरील जनतेस **"माझे स्वप्नातील गाव"** ही संकल्पना राबविणेसाठी योजनेमध्ये वाव आहे.

**वित्त आयोगाचा मागोवा**

| अ.क्र. | वित्त आयोग | निधी वाटपाचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|
| | | जि.प.स्तर | पं.स.स्तर | ग्रा.पं.स्तर |
| १ | १० वा वित्त आयोग | १०० % | - | - |
| २ | ११ वा वित्त आयोग | १०० % | - | - |
| ३ | १२ वा वित्त आयोग | २० % | ३० % | ५० % |
| ४ | १३ वा वित्त आयोग | १० % | २० % | ७० % |
| ५ | १४ वा वित्त आयोग | - | - | १०० % |

- १४ वा वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना त्यांच्या बळकटीकरणासाठी अनुदान देणेत येत आहे. सदर आयोगाचा कालखंड दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० असा आहे.
- १४ वा वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी केवळ ग्रामपंचायत स्तरावरासाठीच उपलब्ध होणार आहे.
- सदरचा निधी बेसिक ग्रँट व परफॉर्मन्स ग्रँट या स्वरुपात देण्यात येतो.

## निधी वितरणाचे निकष

| अ.क्र | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ग्रामीण लोकसंख्या ( सन २०११ च्या जनगणनेनुसार ) | ९० % |
| २ | ग्रामीण क्षेत्रफळ | १० % |
| **एकूण** | | **१०० %** |

## ग्रामपंचायतीना १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत निधी वितरणाची कार्यपध्दती

- जिल्हा परिषद कोल्हापूरकडून कोल्हापूर जिल्हयातील सर्व १०३० ग्रामपंचायतींना ग्रामीण लोकसंख्या व ग्रामीण क्षेत्रफळ या निकषाप्रमाणे सर्व १०३० ग्रामपंचायतीना ग्रामपंचायतींनी १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत उघडणेत आलेल्या राष्ट्रीयकृत बँक खात्यावर RTGS (Real time Gross settlement ) बँकिग प्रणालीद्वारे वर्ग करणेत येतो.

## १४ वा केंद्रीय वित्त आयोग सन २०१६-१७ ते सन २०१९-२०२० निधी व खर्चाविषयी माहिती

- कोल्हापूर जिल्हयातील सर्व १०३० ग्रामपंचायतीमध्ये **"आमचा गाव, आमचा विकास"** या उपक्रमांतर्गत तीन दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया राबविण्यात आलेली असून सदर नियोजन प्रक्रियेद्वारे गावाच्या विकासासाठी प्राधान्यक्रमानुसार कामांची निवड करण्यात आलेली आहे. सदर प्रक्रियेद्वारे सन २०१६-१७ चा दिडपट वार्षिक विकास आराखडा व सन २०१६-१७ ते सन २०१९-२०२० या चार वर्षाचा दुप्पट बृहत विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. सदर आराखड्यास त्या त्या संबंधित गावाच्या ग्रामसभेची मान्यता घेतलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व १०३० ग्रामपंचायतींचे आराखडे संबंधित पंचायत समितीच्या तालुका स्तरीय छाननी समितीकडून छाननी करणेत आलेले आहेत.

**१४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत आराखडयामध्ये खालीलप्रमाणे निधीचे विभागनिहाय निधीचे नियोजन करण्यात आले आहे.**

अ. महिला व बाल कल्याण १० %

ब. अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात.

क.आरोग्य, शिक्षण, उपजिविका ( Livelihood ) २५ %

वरील अ,ब व क प्रमाणे विकास आराखडयामध्ये निधी राखून ठेवून सदर निधीमधून वरील अ,ब व क मध्ये नमुद बाबींवर खर्च करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार बंधनकारक आहे.

ड. उर्वरित निधीतून मुलभूत विकासाची कामे प्राधान्यक्रमानुसार निवड करुन आराखडयामध्ये खर्चाचे मर्यादेत समाविष्ठ करावयाची आहेत.

## १४ वा केंद्रिय वित्त आयोगांतर्गत सन २०१५-२०१६ ते सन २०१९-२०२० मिळणाऱ्या निधीची विगतवारी खालील प्रमाणे आहे.

<table>
<tr><th rowspan="2">अ.नं</th><th rowspan="2">तालुक्याचे - नांव</th><th rowspan="2">सन २०१५-१६ मध्ये दिलेले अनुदान रक्कम रुपये</th><th rowspan="2">सन २०१६-१७ मध्ये दिलेले अनुदान रक्कम रुपये</th><th colspan="3">सन २०१७-१८ ते सन २०१९-२० मध्ये मिळणारे संभाव्य</th><th rowspan="2">सन २०१५-१६ ते सन २०१९-२० मध्ये एकुण एकत्रित रक्कम रुपये</th></tr>
<tr><th>एकुण एकत्रित रक्कम सन २०१७-१८</th><th>एकुण एकत्रित रक्कम सन २०१८-१९</th><th>एकुण एकत्रित रक्कम सन २०१९-२०</th></tr>
<tr><td>१</td><td>कागल</td><td>५३०३५१९४</td><td>७३४३६५३२</td><td>८४८४९४५४</td><td>९८१५५२७२</td><td>१३२६२८८५५</td><td>४४२१०५३०७</td></tr>
<tr><td>२</td><td>पन्हाळा</td><td>५८९४६०८२</td><td>८१६२११९३</td><td>९४३०६११०</td><td>१०९०९४८९०</td><td>१४७४१०६२८</td><td>४९१३७८९०३</td></tr>
<tr><td>३</td><td>चंदगड</td><td>४७८६९०११</td><td>६६२८३०४५</td><td>७६५८४२२९</td><td>८८५९३९२१</td><td>११९७०९४१६</td><td>३९९०३९६२२</td></tr>
<tr><td>४</td><td>गगनबावडा</td><td>१०५२८९५५</td><td>१४५७९१८६</td><td>१६८४४९६७</td><td>१९४८६५४०</td><td>२६३३०५०१</td><td>८७७७०१४९</td></tr>
<tr><td>५</td><td>करवीर</td><td>१०८०४७१४८</td><td>१४९६१०२३६</td><td>१७२८६१४६८</td><td>१९९९६९०४६</td><td>२७०२०११२८</td><td>९००६८९०२६</td></tr>
<tr><td>६</td><td>आजरा</td><td>३०१४४११०</td><td>४१७३९८१०</td><td>४८२२६६८०</td><td>५५७८९४३१</td><td>७५३८३५०४</td><td>२५१२८३५३५</td></tr>
<tr><td>७</td><td>भुदरगड</td><td>३७५६७१८२</td><td>५२०१८३५५</td><td>६०१०२६३५</td><td>६९५२७७३५</td><td>९३९४६९०४</td><td>३१३१६२८११</td></tr>
<tr><td>८</td><td>शिरोळ</td><td>७१४८४६८०</td><td>९८९८३०८२</td><td>११४३६६२४६</td><td>१३२३००७९२</td><td>१७८७६६७८६</td><td>५९५९०१५८६</td></tr>
<tr><td>९</td><td>हातकणंगले</td><td>१०८७६३११६</td><td>१५०६०१६१८</td><td>१७४००६९२४</td><td>२०१२९४१२८</td><td>२७१९९१६०२</td><td>९०६६५७३८८</td></tr>
<tr><td>१०</td><td>गडहिंग्लज</td><td>४५९७०८१७</td><td>६३६५४६६३</td><td>७३५४७३६४</td><td>८५०८०८२४</td><td>११४९६२४६८</td><td>३८३२१६१३६</td></tr>
<tr><td>११</td><td>राधानगरी</td><td>४८७०३७६७</td><td>६७४३८९११</td><td>७७९११७३१</td><td>९०१३८८५१</td><td>१२१७९६९४८</td><td>४०५९९८२०८</td></tr>
<tr><td>१२</td><td>शाहूवाडी</td><td>४७२५३९३८</td><td>६५४३१३६९</td><td>७५६००१९२</td><td>८७४५५५७०</td><td>११८१७१२६०</td><td>३९३९१२३२९</td></tr>
<tr><td colspan="2">कोल्हापूर जिल्हा एकुण एकंदर</td><td>६६८३१४०००</td><td>९२५३९८०००</td><td>१०६९२१६०००</td><td>१२३६८८७०००</td><td>१६७१३०००००</td><td>५५७१११५०००</td></tr>
</table>

## १४ वा केंद्रिय वित्त आयोगांतर्गत सन २०१६-१७ निधी वितरण माहिती

<table>
<tr><th>अ. नं.</th><th>तपशिल</th><th>शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान</th><th>ग्रामपंचायतीना लोकसंख्या व क्षेत्रफळ प्रमाणे वितरीत केलेले अनुदान</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>जनरल बेसिक ग्रँट</td><td>९२.५३ कोटी</td><td>९२.५३ कोटी</td><td rowspan="3">सदरचे सर्व अनुदान RTGS बँकींग प्रणालीव्दारे जिल्ह्यातील सर्व १०३० ग्रा.पं. चे खातेवर वर्ग करणेत आलेले आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>परफॉर्मन्स ग्रँट</td><td>१२.१३ कोटी</td><td>१२.१३ कोटी</td></tr>
<tr><td colspan="2">एकुण</td><td>१०४.६६ कोटी</td><td>१०४.६६ कोटी</td></tr>
</table>

## ग्रामपंचायत विकास आराखड्याची आवश्यकता

- ग्रामपंचायत स्तरावर मानव विकास निर्देशांकावर आधारित विकास प्रक्रिया राबविणे.
- ग्रामपंचायत स्तरावर मोठया प्रमाणात मिळणाऱ्या निधीचे सुयोग्य नियोजन.
- ग्रामपंचायत मधील विकास प्रक्रिया एकात्मिक व सर्व समावेशक करणे.
- गावातील नागरिकांचा आणि गावांचा शाश्वत विकास साधणे.
- लोकसहभागातुन मर्यादित संसाधनाद्वारे आपल्या ग्रामपंचायत मधील समस्या सोडविण्यासाठी.
- गावातील नागरिक, लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या समन्वयातून विकास करणे.
- केंद्र शासनाच्या सुचनांनुसार १४ व्या वित्त आयोगाचा निधी मिळविण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्य शासनाने आमचा गाव, आमचा विकास या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर २०१५ रोजीचे शासन निर्णयान्वये घेतला आहे.

## ग्रामपंचायत विकास आराखडा

**ग्रामपंचायत विकास आराखड्याचा कालावधी**

सन २०१६-१७ ते सन २०१९-२०२०

**ग्रामपंचायत विकास आराखडा दोन प्रकारे करावयाचा आहे**

प्रारंभास पंचवार्षिक बृहत विकास आराखडा

दरवर्षी वार्षिक कृती आराखडा

**१४ वा वित्त आयोग अंतर्गत कामे सुरु करणेस प्रशासकिय मान्यता, तांत्रिक मान्यता व कार्यारंभ आदेश विषयी खालीलप्रमाणे कार्यवाही अनुसरावयाची आहे.**

**अ) प्रकल्प अहवाल-**

ग्रामपंचायतीमधील गाव विकास आराखडयामध्ये समाविष्ठ केलेल्या प्रत्येक कामाविषयी कामाची निकड, कामाचे स्वरुप, अंदाजित अर्थसंकल्पिय तरतुद, तांत्रिक अधिकारी यांचे काम हाती का घ्यावयाचे याबाबतचे अभिप्राय, फलनिष्पती बाबत अभिप्राय इत्यादी बाबी नमुद करुन गाव आराखडयामध्ये समाविष्ठ प्रत्येक कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचा प्रत्येक कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणेत येवून तालुकास्तरीय छाननी समितीने सदरचे प्रकल्प अहवाल छाननी करुन घ्यावेत.

**ब) प्रशासकिय मान्यता-**

१. गटस्तरीय छाननी समितीकडून छाननी केलेल्या व तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेल्या ग्रामपंचायत विकास आराखड्यास ग्रामसभा अंतीम मान्यता देईल.
२. ग्रामसभेची ग्रामपंचायत विकास आराखड्यास अंतीम मान्यता हीच संपूर्ण आराखड्यास प्रशासकिय मान्यता गृहित धरणेत येईल.
३. ग्रामपंचायत विकास आराखड्यात समावेश असलेल्या प्रत्येक उपक्रम/काम/ प्रकल्पास संबंधित तांत्रिक विभागाकडून तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर ग्रामपंचायत त्यास मासिक सभेत प्रशासकिय मान्यता देईल.

**क) सविस्तर अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यता-**

१. ग्रामपंचायत विकास आराखड्यात समावेश असलेल्या प्रत्येक प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक शासकिय आर्थिक निकष विचारात घेऊन ग्रामपंचायतीने पुरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे तांत्रिक अधिकारी तयार करेल व ते तांत्रिक मान्यतेसाठी सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याकडे पाठविल.
२. सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यासाठी ग्रामपंचायतीने पुरविलेल्या कागदपत्रांच्या आधारे तांत्रिक अधिकारी अंदाजपत्रक तयार करेल.
३. सदर सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी तांत्रिक मान्यता देतील.

४. ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये बांधकाम विषयक कामांना शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी २०१३ मध्ये नमुद केलेनुसार वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून तांत्रिक मान्यता सक्षम प्राधिकारी यांची घ्यावयाची आहे. तसेच पाणी पुरवठा विषयक कामांना शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी २०१३ मध्ये नमुद केलेनुसार वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून तांत्रिक मान्यता सक्षम प्राधिकारी यांची घ्यावयाची आहे. ज्या योजनेंतर्गत काम घ्यावयाचे आहे त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केलेला सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेणेत येईल.

**ड) निविदा व कार्यारंभ आदेश-**

१. ग्रामपंचायत विकास आराखड्यातील तांत्रिक व प्रशासकिय मान्यता मिळालेल्या कामांसाठी सदरचे कामे ज्या मुळ योजनेमध्ये यापूर्वी अनुज्ञेय होते त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहून ग्रामपंचायत आवश्यकतेनुसार ई-निविदा काढेल.
२. ज्या योजनेच्या निधीतून काम हाती घेण्यात येणार आहे, त्या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद केलेला सक्षम प्राधिकारी यांचे मार्गदर्शनाखली ग्रामपंचायत त्या कामाचा कार्यारंभ आदेश देईल.

**१४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत घेणेत येणा-या कामाविषयी अन्य आवश्यक सूचना**

- शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट २०१६ मधील सुचनांनुसार ग्रामपंचायतींमध्ये **"आपले सरकार सेवा केंद्र"** उभारणी व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक ५.६ मधील सुचनांप्रमाणे १४ वा केंद्रीय वित्त आयोगाचा निधी या प्रकल्पासाठी (ग्रामपंचायतीने त्यांना मिळालेल्या १४ वा वित्त आयोगातून प्राप्त निधीच्या १० % प्रशासकिय निधीमधून या प्रकल्पासाठी खर्च करु शकतील. अर्थात, १० % प्रशासकिय निधीमधून इतर प्रशासकिय कामेही घेणे आवश्यक असल्यामुळे सदर खर्च ५% (१० % प्रशासकिय निधीच्या ५० %) च्या मर्यादेत असणे बंधनकारक राहील. तथापि, सदर निधी अपुरा पडल्यास उर्वरित खर्च १४ वा वित्त आयोगाच्या ९० % अनुदानातून किंवा ग्रामपंचायत स्वनिधीतून /मुक्त निधीतून उपलब्ध करणे शक्य आहे. कारण सदर (ग्रामपंचायतीचे संगणकीकरण, नागरिकांना ऑनलाईन

सेवा उपलब्ध करणे इ.) सेवा या ई- गर्व्हनन्स सेवांतर्गत मुलभूत सेवांमध्ये समाविष्ठ करणेत आलेल्या आहेत.

- शासन निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ मधील तरतुदीप्रमाणे मुद्दा क्रमांक ८ अन्वये १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत निधी **वैयक्तिक लाभार्थीसाठी/ योजनांसाठी खर्च करता येणार नाही.**
- १४ वा वित्त आयोगांतर्गत आपल्या गावास प्राप्त होणारा निधी ग्रामपंचायतींना लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषाप्रमाणे तसेच परफॉर्मन्स ग्रँट पात्र ग्रामपंचायतीना रक्कम ग्रामपंचायतींच्या १४ वा केंद्रीय वित्त आयोग अंतर्गत उघडणेत आलेल्या राष्ट्रीयकृत बँक खात्यावर RTGS बँकिंग प्रणालीव्दारे वेळोवेळी वितरित होणार असून सदर बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दरवर्षी शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान आदेशाअन्वये वर्ग करणेत येणार आहे. सदर आदेशामध्ये नमुद सर्व अटींचे पालन ग्रामपंचायतीनी करणे अनिवार्य आहे. सदर आदेशा सोबत जोडणेत आलेल्या आपल्या ग्रामपंचायतीचे यादीनुसार प्रत्येक गावांनी रक्कम प्राप्त झालेबाबत ग्रामपंचायतीच्या १४ वा केंद्रीय वित्त आयोग बँक पासबुकावरुन पडताळणी करावी. आदेशामधील रक्कमेप्रमाणे रक्कम जमा झाली नसलेस अथवा जादा जमा झाली असलेस सदरबाबतची माहिती तात्काळ पंचायत समितीला लेखी दयावयाची आहे. लेखापरीक्षणामध्ये कमी रक्कम जमा अथवा जादा रक्कम जमा याबाबत आक्षेप घेतलेस आर्थीक अनियमितता विषयी जबाबदार संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक राहतील.
- ग्रामपंचायतींनी १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत बँक खात्यातील व्यवहार ग्रामपंचायतींच्या नावाने सरपंच व ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने होणे अनिवार्य राहिल.
- १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणारा निधी शासन निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर २०१५ अन्वये तीन दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया राबवून सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षाचा ग्रामपंचायत बृहत विकास आराखडा तयार करुन त्याचा प्राधान्यक्रम ठरवून त्यास तालुकास्तरीय छाननी समितीने छाननी पूर्ण करुन **ग्रामपंचायत विकास आराखड्यास गावसभेने अंतीम मान्यता दिलेल्या कामांच्या प्राधान्यक्रमानुसार** खर्च करावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये नमुद कामे, उपक्रम यावरच निधी खर्च करावयाचा असून अन्य कोणत्याही योजनेमध्ये अथवा बाबींवर सदरचा निधी खर्च करणेचा नाही.

- सदर योजनेंतर्गत घेणेत आलेली कामे इतर कोणत्याही योजनेतून प्रस्तावित, मंजूर अथवा प्रगतीपथावर नसावित अथवा यापुर्वी कोणत्याही योजनेतून पूर्ण झालेली नसावीत याची खबरदारी ग्रामपंचायतीने घ्यावी. तसेच कोणत्याही परिस्थितीत एकाच कामावर दुबार खर्च होणार नाही याची दक्षता ग्रामपंचायतीने घेण्यात यावी.
- १४ वा केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीचे हिशोब ठेवणे/ त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सर्व स्तरावरुन प्राप्त करुन घेणे आणि ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे प्रियासॉफ्ट या संगणकीय अज्ञावलीत ठेवणे, सदरच्या खर्चाची भौतिक व आर्थिक विषयक माहितीच्या समन्वयाची व प्रस्तुत माहिती दरमहा SIMNIC प्रणालीमध्ये भरणे याची जबाबदारी ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांची राहील याकामी त्यांचेवर गट विकास अधिकारी यांचे नियंत्रण असेल.
- १४वा केंद्रिय वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडयामध्ये समाविष्ट असलेली कामे प्लॅन प्लस "Plan Plus (Version २.०)" या संगणक आज्ञावलीमध्ये भरणेत यावेत.
- सदर **"आमचा गाव आमचा विकास"** या उपक्रमांतर्गत सनियंत्रण बाबत ग्रामपंचायत आराखडा तयार करण्याची प्रक्रिया, त्याची अंमलबजावणी व त्यानंतर निधीचे उपयोगिता इत्यादी बाबत नियमितपणे आढावा घेवून सनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा पातळीवरील समित्यांची राहिल.

**चौदावा केंद्रिय वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या वितरणाबाबतचे निकष व सनियंत्रण या बाबत मार्गदर्शक सुचना.**

१. **ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण-**

राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखापरिक्षण संचालक, स्थानिक निधी लेखा यांच्यामार्फत केले जाते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात परफॉर्मन्स ग्रँट मिळण्याकरिता पात्र ठरण्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण दिनांक ३१ ऑगस्ट,२०१६ अखेर झालेले असावे. ज्या ग्रामपंचायती दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ अखेर ही अट पूर्ण करतात त्यांना या अटीच्या पूर्तते करीता विहित केलेले ८० गुण मिळतील. ज्या ग्रामपंचायती दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ अखेरपर्यंत ही अट पूर्ण करणार नाहीत, त्यांना हे गुण मिळणार नाहीत व त्या ग्रामपंचायती सन २०१६-१७ चे परफॉर्मन्स ग्रँट मिळण्याकरीता अपात्र ठरतील.

२. **ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नात वाढ-**

वरील लेखापरिक्षित लेख्याच्या आधारे ग्रामपंचायतीने स्वउत्पन्नात मागील वर्षापेक्षा वाढ झाल्याचे दर्शविणे आवश्यक आहे. स्वउत्पन्नाच्या वाढीकरीता २० पैकी दिनांक २८.४.२०१६ च्या शासन निर्णयात दिलेल्या खालील तक्त्यानुसार गुण मिळतील.

| **अ.क्र** | **वर्ष** | **निकष** | **गुण** |
|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण | ८० गुण |
| | | ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्नात वाढ<br>स्वउत्पन्नात वाढ १० % पर्यंत - ५ गुण<br>स्वउत्पन्नात वाढ २५ % पर्यंत - १० गुण<br>स्वउत्पन्नात वाढ ५० % पर्यंत - १५ गुण<br>स्वउत्पन्नात वाढ ५० % पेक्षा जास्त - २० गुण | २० गुण |
| | | **एकूण** | **१०० गुण** |

- सन २०१६-१७ चे परफॉर्मन्स ग्रँट मिळण्याकरीता पात्र ठरण्यासाठी ग्रामपंचायतींनी वरील तक्त्याप्रमाणे **१०० गुणांपैकी एकत्रित कमीत कमी ८५ गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

- वरील परफॉर्मन्स ग्रँट मिळणेकरिता निकष पुर्ण करणाऱ्या पात्र ग्रामपंचातींना लोकसंख्या (९०% ) व क्षेत्रफळ (१०% ) या आधारे निधी वितरीत करणेत येणार आहे.
- परफॉर्मन्स ग्रँट अनुदानाची रक्कम या संदर्भात देणेत येणाऱ्या विहीत उद्‍िष्टावरच खर्च करावी. इतर योजना व कार्यक्रमावर खर्च करणेत येवू नये.
- शासनाने विहीत उदिष्टा व्यतिरिक्त इतर बाबीवर निधी खर्च केल्यास ती रक्कम संबंधित जबाबदार पदाधिकाऱ्यांकडून/ कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात येईल.

## जिल्हा स्तरीय सनिंयत्रण समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| सभापती, विषय समित्या, जिल्हा परिषद (सर्व) | - | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख | - | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत | - | निमंत्रक |

## जिल्हास्तरीय कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | - | अध्यक्ष |
| अतिरीक्त मुख्य कार्यकारी, अधिकारी जिल्हा परिषद | - | उपाध्यक्ष |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) | - | सदस्य |
| जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख | - | सदस्य |
| गट विकास अधिकारी (सर्व) | - | सदस्य |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) | - | निमंत्रक |

******************

# जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधा पुरविणे

## योजनेची संक्षिप्त माहिती

**अ) योजनेंतर्गत घ्यावयाची कामे-**

१. दहन दफन भूमी संपादन.
२. चबुतऱ्याचे बांधकाम करणे.
३. स्मशानशेडचे बांधकाम.
४. स्मशानभूमीकडे जाणारा पोहोच रस्ता.
५. गरजेनुसार कुंपन व भिती घालणे.
६. पिण्याच्या पाण्याची सोय करणे.
७. जमिन सपाटीकरण व तळफरशी घालणे.

सदर योजनेमधून निधी मंजूर करताना गावची लोकसंख्या विचारात घेऊन एका गावाकरिता उपरोक्त अ साठी जास्तीत जास्त १०.०० लाख रुपये निधी अनुज्ञेय आहे.

**ब) ग्रामपंचायत भवन/कार्यालय बांधणे-**

१. नविन ग्रा.प.इमारत बांधकाम करणे व इमारती अंतर्गत सुविधा.
२. जुन्या ग्रा.प.इमारतींची पुर्नबांधणी /विस्तार.

**ब** करिता एका ग्राम पंचायतीसाठी जास्तीत जास्त १२.०० लक्ष निधी अनुज्ञेय आहे.

**क)** शासन शुध्दीपत्रक क्रजनसु -२०१६/प्र.क्र.२१०/पंरा-६ दि, ०३/०१/२०१७ नुसार खालील नवीन कामांचा जनसुविधा योजना अंतर्गत समावेश करणेत आलेला आहे.

१. ग्रा.प.हद्दीत आठवडी बाजार केंद्र विकसित करणे.
२. आस्तित्वात असलेल्या विहीरीवर सौरऊर्जेवर आधारित दुहेरी हातपंप बसविणे तसेच जलशुध्दीकरण आर ओ प्लांटची व्यवस्था करणे.
३. गावतलावातील गाळ काढून गावतलावाचे सुशोभीकरण करणे.
४. घनकचरा व्यवस्था करणे.
५. भूमीगत गटारे बांधणे.

**योजनेचे निकष व अटी शर्ती-**

१. ग्रामपंचायतीची मागणी, ठराव.

२. ग्राम पंचायत मालकीच्या जागेचा उतारा.

३. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नोंद असलेला ग्रा.प.नमुना नं.२६ चा उतारा.

४. समजुतीचा नकाशा.

५. अंदाजपत्रक.

**योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**

- जिल्हयातील मा.लोकप्रतिनिधी,मा.ना.पालकमंत्री महोदय, मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.पदाधिकारी व जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या वर नमूद शासन निर्णयातील कामांच्या शिफारशी विचारात घेतल्या जातात.
- सदर शिफारशी मधून शासन निर्णयातील निकषाच्या आधारे शिफारस केलेल्या कामांमधून कामांचा आराखडा तयार करुन त्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जाते.
- सदर आराखडा जि.प. सर्वसाधारण सभेच्या शिफारशीने अंतिम मान्यत्ये करिता जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मंजूरी करिता सादर केला जातो.
- जिल्हा नियोजन समिती आराखडयास अंतिम मान्यता देते व मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांचे मार्फत जिल्हा परिषदेस मंजूर आराखडयातील कामांना निधी उपलब्ध करुन देतात.
- मंजूर आराखडयातील कामांची यादी तालुका निहाय गट विकास अधिकारी यांना कळविणेत येऊन त्यांचे कडून परिपूर्ण प्रस्ताव (अंदाजपत्रकासह )प्रशासकीय मान्यते करिता ग्राम पंचायत विभागाकडे सादर केला जातो.
- गट विकास अधिकारी यांचे कडून प्राप्त प्रस्तावांची ग्रा.प.विभागा मार्फत छाणनी होऊन वित्तीय छाणनी करिता प्रस्ता वित्त विभाग जि.प. कडे प्रस्ताव सादर केला जातो.
- वित्त विभागाकडील छाणनी अंती रु.१० लक्ष पर्यतच्या कामांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) हे प्रशासकीय मान्यता देतात. व रु.१० लक्ष वरील व रु २० लक्ष पर्यंतच्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रशासकीय मान्यता देतात.
- प्रशासकीय मान्यता दिलेले कामांचे प्रस्ताव तांत्रिक मान्यता , निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश व प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे करिता कार्यकारी अभियंता (बांध.)

यांचेकडे सादर केले जातात.व त्या सर्व पक्रिया कार्यकारी अभियंता यांचे मार्फत पूर्ण केल्या जातात.

- कामांच्या प्रगती नुसार देयके बांधकाम विभागामार्फत वित्त विभागाकडे सादर करणेत येऊन वित्त विभागा कडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- सदर योजने करिता संनियंत्रण अधिकारी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे आहेत.

**योजनेचे फायदे-**

१. दहन/दफन भूमी सोईमुळे मृतदेहावर अंत्यसंस्कार करुन धार्मिक विधी करणे सोईचे होणार आहे.

२. ग्रामपंचायतीची अद्यावत कार्यालयीन इमारत झालेमुळे ग्राम पंचायतींचे कामकाज करणे व नागरीकांना सोयीसुविधा पुरविणे सुलभ होणार आहे.

३. बाजारपेठ सोय, शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय , जलस्त्रोतांचे बळकटीकरण्, घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. सोयी सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**सुलभ संदर्भासाठी शासन निर्णय खालील प्रमाणे आहेत.**

१. ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन कडील शासन निर्णय क्र.ददभू/२०१०/ प्र.क्र.६२/ दि.१६/९/२०१०

२. शासन निर्णय क्र.जनसु-२०१५/प्र.क्र.५९/यो-६ दि.३१/१०/२०१५

३. शासन शुध्दीपत्रक क्रजनसु -२०१६/प्र.क्र.२१०/पंरा-६ दि, ०३/०१/२०१७

*********************

# जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणे

## योजनेची संक्षिप्त माहिती

**योजनेच्या मार्गदर्शक सुचना-**

शासन निर्णया प्रमाणे सन २०११ च्या जनगणने नुसार ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायती सदर योजनेंतर्गत निधी मिळविणे करिता पात्र आहेत. शासन निर्णयातील परि.क्र.१.२ ते १.९ मधिल कामांसाठी ९० टक्के शासन निधी अनुज्ञेय असून उर्वरीत १० टक्के निधी हा ग्रा.प.ने स्वनिधितून किंवा इतर स्त्रोतातून उपलब्ध करुन घ्यावा.

**शासन निर्णयाप्रमाणे योजनेंतर्गत घ्यावयाची कामे-**

१.१ नियोजनबध्द विकास.

१.२ बाजारपेठ विकास.

१.३ सार्वजनिक दिवाबत्ती सोय.

१.४ बागबगीचे, उद्याने तयार करणे.

१.५ गावांतर्गत रस्ते करणे.

१.६ ग्राम सचिवालय बांधणे.

१.७ सांडपाणी व्यवस्थापनासाठी भुमिगत नाल्यांचे बांधकाम करणे.

१.८ छोट्या ओढ्यावर घाट/ साकव बांधणे.

१.९ अभ्यास केंद्र/ वाचनालय/ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे.

सदर योजनेंतर्गत वरील सर्व कामांसाठी मिळून एक वर्षाकरिता जास्तीत जास्त ५० लाख रुपये व ५ वर्षांच्या प्रकल्प कालावधीत जास्तीत जास्त २ कोटी रुपये अनुज्ञेय आहेत.

**योजनेचे निकष व अटी शर्ती-**

१. ग्रामपंचायतीची मागणी , ग्राम सभेने कामाची निवड करुन प्रशासकीय मान्यता दिलेचा ठराव.
२. ग्राम पंचायत मालकीच्या जागेचा उतारा.
३. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नोंद असलेला ग्रा.प.नमुना नं.२६ चा उतारा.
४. समजुतीचा नकाशा.
५. अंदाजपत्रक.

**योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**

- जिल्हयातील मा.लोकप्रतिनिधी,मा.ना.पालकमंत्री महोदय,मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.पदाधिकारी व जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या निधीच्या मंजूरी करिता शिफारशी विचारात घेतल्या जातात.
- शासन निर्णयात नमूद केलेल्या कामां करिता ग्रामपंचायतीस निधी मंजूर होणे करीता पात्र ग्राम पंचायतींच्या यादीस जि.प.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जाते.
- सदर आराखडा जि.प. सर्वसाधारण सभेच्या शिफारशीने अंतिम मान्यत्ये करिता जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मंजूरी करिता सादर केला जातो.
- जिल्हा नियोजन समिती आराखडयास अंतिम मान्यता देते व मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांचे मार्फत जिल्हा परिषदेस मंजूर आराखडयातील कामांना निधी उपलब्ध करुन देतात.
- मंजूर आराखडयातील ग्राम पंचायतींची व मंजूर निधीची यादी तालुका निहाय गट विकास अधिकारी यांना कळविणेत येते.
- शासन निर्णयातील निकषाच्या आधारे व मंजूर निधीच्या मर्यादेत ग्राम सभेने कामांची निवड करुन निवडलेल्या कामांना ग्राम सभा प्रशासकीय मान्यता देईल .
- सदर ग्राम सभेने निवडलेल्या कामाच्या एकत्रीत आराखडयास मुख्य कार्यकारी अधिकारी मान्यता देतील.
- मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूर केलेल्या प्रत्येक कामाचा परिपूर्ण प्रस्ताव(अंदाजपत्रकासह ) मान्यते करिता ग्राम पंचायत विभागाकडे सादर केला जातो.
- मंजूर आराखडयातील सर्व कामांच्या एकूण रकमेच्या १० टक्के रक्कम ग्राम पंचायतीने स्वनिधी मधून उपलब्ध करुन देऊन त्याचा धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे काढून ग्राम पंचायत विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.
- प्राप्त प्रस्तावांची ग्रा.प.विभागा मार्फत छाणनी होऊन वित्तीय छाणनी करिता प्रस्ता वित्त विभाग जि.प. कडे प्रस्ताव सादर केला जातो.
- वित्त विभागाकडील छाणनी अंती रु.१० लक्ष पर्यतच्या कामांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) हे मान्यता देतात. व रु.१० लक्ष वरील व रु २० लक्ष पर्यंतच्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी हे मान्यता देतात.

- मान्यता दिलेले कामांचे प्रस्ताव तांत्रिक मान्यता , निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश व प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी करणे करिता कार्यकारी अभियंता (बांध.) यांचेकडे सादर केले जातात.व त्या सर्व प्रक्रिया कार्यकारी अभियंता यांचे मार्फत पूर्ण केल्या जातात.
- कामांच्या प्रगती नुसार देयके बांधकाम विभागामार्फत वित्त विभागाकडे सादर करणेत येऊन वित्त विभागा कडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- सदर योजने करिता संनियंत्रण अधिकारी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे आहेत.

**योजनेचे फायदे-**

१. मोठया ग्राम पंचायतींचा नियोजनबध्द विकास करुन त्यांना विकासकेंद्र म्हणून विकसीत होण्यास मदत होणार आहे.

२. ग्रामपंचायतीचा आर्थीक, सामाजिक,सांस्कृतीक, औद्योगिक , कृषी औद्योगिक आणि वाणिज्यिक विकास होण्यासाठी व प्राधान्याने तेथील राहणीमान दर्जेदार होण्यासाठी शहराच्या तोडीच्या मुलभूत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**सुलभ संदर्भासाठी शासन निर्णय खालील प्रमाणे-**

१. शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४ दिनांक १६ सप्टेंबर २०१०.

२. शासन शुध्दीपत्रक क्र.व्हीपीएम २६१०/प्र.क्र.१२९/पंरा-४ दिनांक २० ऑक्टोंबर २०११

३. शासन शुध्दीपत्रक क्र.व्हीपीएम २६१०/प्र.क्र.२७२/पंरा-४ दिनांक १५ मार्च २०१३

४. शासन निर्णय . व्हीपीएम २०१५/प्र.क्र.५९/पंरा-६दिनांक १ ऑगस्ट २०१६

# सन २०११ च्या जनगणने नुसार नागरी सुविधा साठी पात्र असलेल्या ग्राम पंचायतींची तालुकानिहाय यादी

| अ नं | | तालुका | अ नं | | तालुका | अ नं | | तालुका | अ नं | | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | **आजरा** | ८ | | **करवीर** | १० | | **हातकणंगले** | ११ | | **शिरोळ** |
| | १ | उत्तूर | | १ | नेर्ली | | १ | साजणी | | १ | उमळवाड |
| | २ | आजरा | | २ | बालींगा | | २ | तळंदगे | | २ | आगर |
| २ | | **भुदरगड** | | ३ | तामगांव | | ३ | खोची | | ३ | टाकळी |
| | १ | मडिलगे बु | | ४ | वाशी | | ४ | लाटवडे | | ४ | शिरटी |
| | २ | गारगोटी | | ५ | शिरोली दु | | ५ | जुने पारगाव | | ५ | अर्जुवाड |
| ३ | | **चंदगड** | | ६ | कोपार्डे | | ६ | तळसंदे | | ६ | गणेशवाडी |
| | १ | चंदगड | | ७ | कणेरीवाडी | | ७ | अंबप | | ७ | तेरवाड |
| ४ | | **गडहिंग्लज** | | ८ | पाडळी खु | | ८ | रांगोळी | | ८ | शिरदवाड |
| | १ | कडगांव | | ९ | परिते | | ९ | नवे पारगाव | | ९ | घोसरवाड |
| | २ | गिजवणे | | १० | ागिवे खा | | १० | नरंदे | | १० | आलास |
| | ३ | हलकर्णी | | ११ | चिंचवाड | | ११ | इंगळी | | ११ | हेरवाड |
| | ४ | क.नूल | | १२ | वाकरे | | १२ | खोतवाडी | | १२ | धरणगुत्ती |
| | ५ | नेसरी | | १३ | चिखली | | १३ | वा.त.वडगाव | | १३ | चिपरी |
| | ६ | महागांव | | १४ | खुपिरे | | १४ | सावर्डे | | १४ | कोथळी |
| | ७ | बडयाचीवाडी | | १५ | निगवे दुा | | १५ | किणी | | १५ | टाकवडे |
| | ८ | भडगांव | | १६ | कणेरी | | १६ | यळगुड | | १६ | आकिवाट |
| ५ | | **कागल** | | १७ | मोरेवाडी | | १७ | घुणकी | | १७ | शिरढोण |
| | १ | म्हाकवे | | १८ | शिगणापूर | | १८ | माणगाव | | १८ | दत्तवाड |
| | २ | सुळकुड | | १९ | वसगडे | | १९ | नागाव | | १९ | यड्राव |
| | ३ | चिखली | | २० | सांगरुळ | | २० | टोप | | २० | दानोळी |
| | ४ | सिध्दोर्ली | | २१ | गो.शिरगांव | | २१ | आळते | | २१ | उदगाव |
| | ५ | बोरवडे | | २२ | उजळाईवाडी | | २२ | भादोले | | २२ | नांदणी |
| | ६ | मौजे सांगाव | | २३ | शिये | | २३ | हेर्ले | | २३ | लाट |
| | ७ | कापशी/(बाळीक्रे) | | २४ | कळंबे त.ठाणे | | २४ | रुई | | २४ | शिरोळ |
| | ८ | कसबा सांगाव | | २५ | वळीवडे | | २५ | कुंभोज | | | |
| ६ | | **पन्हाळा** | | २६ | गांधीनगर | | २६ | हातकणंगले | | | |
| | १ | बहिरेवाडी | | २७ | मुडशिंगी | | २७ | चंदूर | | | |
| | २ | वाडीरत्नागिरी | | २८ | वडणगे | | २८ | तारदाळ | | | |
| | ३ | माले | | २९ | पाचगांव | | २९ | रुकडी | | | |
| | ४ | यवलूज | | ३० | उचगांव | | ३० | प.कोडोली | | | |
| | ५ | कोतोली | ९ | | **राधानगरी** | | ३१ | रेंदाळ | | | |
| | ६ | सातवे | | १ | ठिकपूर्ली | | ३२ | कोरोची | | | |
| | ७ | कळे | | २ | राधानगरी | | ३३ | हुपरी | | | |
| | ८ | पोर्ले/ठाणे | | ३ | का वाळवे | | ३४ | शिरोली | | | |
| | ९ | कोडोली | | ४ | सरवडे | | ३५ | कबनूर | | | |
| ७ | | **शाहूवाडी** | | ५ | राशिवडे बु// | | | | | | |
| | १ | सरुड | | | | | | | | | |

## जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत क वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना

### योजनेची संक्षिप्त माहिती

**क वर्ग दर्जा :-**

शासन निर्णयानुसार वर्षभरात १ लाखापेक्षा जास्त भाविकांच्या उपस्थिती बाबतचा जिल्हा पोलिस अधिक्षक यांचा दाखला प्राप्त झाले नंतर सदर तिर्थक्षेत्राचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती समोर क वर्ग दर्जा मिळणे करिता सादर केला जातो व त्यास जिल्हा नियोजन समिती सभेत क वर्ग ग्रामीण तिथक्षेत्र म्हणून मान्यता देणेत येते.

**योजनेच्या मार्गदर्शक सुचना व शासन निर्णयाप्रमाणे या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे कामे हाती घेता येतात.**

१. यात्रास्थळा पासून ते मुख्य रस्त्या पर्यतचा पोहोच रस्ता
२. पोहोच रस्त्यावर पथदिवे उभारणे.
३. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व नळाद्वारे पाणी पुरवठा करणे.
४. तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढयाजवळ असेल तर संरक्षण भिंत बांधणे.
५. शौचालय व स्नानगृह बांधणे.
६. परिसर सुधारणा अंतर्गत (झाडे लावणे , आवश्यक त्याठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे).
७. वाहनांसाठी पेव्हींग ब्लॉकसह वाहनतळ बांधणे.
८. यात्रास्थळापासून अंतरावर भक्तनिवास बांधणे.

**योजनेचे निकष व अटी शर्ती-**

**१.** ग्रामपंचायतची मागणी, ठराव.
**२.** ग्राम पंचायत/देवस्थान मालकीच्या जागेचा उतारा.
**३.** निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नोंद असलेला ग्रा.प.नमुना नं.२६ चा उतारा
**४.** समजुतीचा नकाशा.
**५.** अंदाजपत्रक.

**योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**

- जिल्हयातील मा.ना.पालकमंत्री महोदय, मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.पदाधिकारी व जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या वर नमूद शासन निर्णयातील कामांच्या शिफारशी विचारात घेतल्या जातात.
- सदर शिफारशी मधून शासन निर्णयातील निकषाच्या आधारे शिफारस केलेल्या कामांमधून कामांचा आराखडा तयार करुन त्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जाते.
- सदर आराखडा जि.प. सर्वसाधारण सभेच्या शिफारशीने अंतिम मान्यत्ये करिता जिल्हा नियोजन समितीच्या सभेत मंजूरी करिता सादर केला जातो.
- जिल्हा नियोजन समिती आराखडयास अंतिम मान्यता देते व मा.जिल्हाधिकारी व सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांचे मार्फत जिल्हा परिषदेस मंजूर आराखडयातील कामांना निधी उपलब्ध करुन देतात.
- मंजूर आराखडयातील कामांची कार्यपध्दती (प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता. निविदा प्रक्रीया, कार्यारंभ आदेश व प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी इ.)जनसुविधा योजने प्रमाणेच जिल्हास्तरावरुन पार पाडली जाते.
- सदर योजने करिता संनियंत्रण अधिकारी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे आहेत.

**योजनेचे फायदे-**

१. यात्रास्थळांच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध झालेने भाविकांची सोय होण्यास मदत.
२. पर्यटकांची/भाविकांची संख्या वाढल्याने स्थानिक रोजगार निर्मिती होण्यास मदत.

**सुलभ संदर्भासाठी शासन निर्णय खालील प्रमाणे-**

१. शासन निर्णय क्र. तिर्थवि/२०११/प्र.क्र.६५१/यो-७ दिनांक १६ नोव्हेंबर २०१२

***************

## अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण भागात मुलभूत/ पायाभूत सुविधा पुरविणे

- ज्या ग्रामीण भागात अल्पसंख्यांकाची लोकसंख्या लक्षणीय आहे अशा ग्रामीण भागात मुलभूत /पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन या भागात वास्तव्यास असलेल्या अल्संख्यांक नागरीकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी अल्पसंख्यांक बहूल ग्रामपंचायत क्षेत्राकरिता सन २०१३-१४ या वर्षापासून ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वीत करण्यात आलेला आहे.
- ज्या ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्यांक समुहाची (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, जैन, व पारशी) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायती या योजनेच्या लाभास पात्र ठरतात.
- निवड झालेल्या ग्रामपंचायतीनी विहित नमुन्यातील प्रस्ताव गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करणेचा आहे. व गट विकास अधिकारी यांनी सर्व कागदपत्राची छानती करुन सदर पस्ताव उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचेकडे सादर करणेत येतो.
- सदर गावांची निवड करण्यासाठी अल्पसंख्यांक बहूल लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने निवडीसाठी विचार केला जातो. सदरच्या प्रस्तावामध्ये जास्तीत जास्त रु.१०.०० लक्षचे कामाचे नियोजन करणेत येते.
- अल्पसंख्यांक बहुल प्रस्ताव सादर करताना खालील कागदपत्राची आवश्यक्ता असते. प्रपत्र-अ, ग्रामसभेने निवड केलेल्या कामाच्या ठरावाची प्रत, सदर निवड केलेल्या कामाचे अंदाजपत्रक, सदरचे काम इतर योजनेमधून घेतले नसलेबाबतचे प्रमाणपत्र.
- सदर योजनेमध्ये मंजूर गावासाठी एकदाच व जास्तीत जास्त १०.०० लक्ष रुपयेचा लाभ देणेत येतो.
- सदर योजनेमध्ये काम निवडण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.
- सदर योजनेअतर्गत अल्पसंख्यांक वस्तीसाठी पुढील प्रमाणे कामे घेता येतात.-

  अ) कब्रस्तान/स्मशान/अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंत बांधणे, पाणी सुविधा, विद्युत पुरवठा व अंतर्गत ३ फुट रुंदीचा रस्ता.

  ब) सार्वजनिक सभागृह / शादीखाना हॉल. पिण्याच्या पाण्याची सुविधा, सांडपाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे. इ.

**सदर योजनेमध्ये गावाची निवड करणेसाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.**

| | |
|---|---|
| मा.जिल्हाधिकारी | - अध्यक्ष. |
| मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य. |
| जिल्हा नियोजन अधिकारी | - सदस्य. |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं) जिल्हा परिषद | - सदस्य सचिव |

# स्मार्ट ग्राम योजना

**योजना कोणाची :-**

सदरची योजना महाराष्ट्र शासनाची असून जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत राबविण्यात येत आहे.

**योजनेची संक्षिप्त माहिती:-**

पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेचे रुपांतर करुन नविन "स्मार्ट ग्राम" योजना सुरू केली आहे. लोकसहभागातून उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करुन पर्यावरणाचा समतोल राखणे, समृध्द ग्राम निर्माण करणे व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरीय योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीस योजनेत सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध आहे.

**योजनेचे निकष व अटी:-**

निकषाच्या आधारे गुणांकन व पारदर्शकता ठेवून ग्रामपंचायतीची निवड करण्यात येते. योजनेत सहभागी होण्यासाठी ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या ग्रामपंचायती, शहरालगत असणा-या ग्रामपंचायती, पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती व उर्वरीत ग्रामपंचायती अशी विभागणी केलेली आहे व त्यानुसार गुणांकन दिलेले आहे. ग्रामपंचायतीला त्यांच्या क्षमतेनुसार गुणांकन देण्यात आले आहे. गुणांकन पध्दत ही **स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपारिक उर्जा आणि पर्यावरण, पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर** या निकषांच्या आधारावर आहे. याकरिता **एकूण १००** गुण ठेवण्यात आले आहेत.

## स्मार्ट ग्राम निवडीचे निकष

- स्वच्छताः-
  १. वैयक्तिक शौचालय सुविधा व वापर
  २. सार्वजनिक इमारतीमधील शौचालय सुविधा व वापर
  ३. पाणी गुणवत्ता तपासणी
  ४. सांडपाणी व्यवस्थापन
  ५. घनकचरा व्यवस्थापन
- व्यवस्थापनः-
  १. पायाभूत सुविधांचा विकास
  २. आरोग्य व शिक्षण विषयक सुविधा
  ३. केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी
  ४. बचतगट
  ५. प्लास्टिक वापर बंदी
- दायित्वः-
  १. ग्रामपंचायतीच्या घरपटटी /पाणीपटटी वसुली तसेच पाणीपुरवठा व पथदिवे यासाठी वापरण्यात येणा-या वीज बिलांचा नियमितपणे भरणा
  २. मागासवर्गीय /महिला बालकल्याण/अपंगावरील खर्च
  ३. लेखापरिक्षण पुर्तता
  ४. ग्रामसभेचें आयोजन
  ५. सामाजिक दायित्व
- अपारंपारिक ऊर्जा व पर्यावरणः-
  १. LED दिवे वापर व विद्युत पथांचे LED दिव्यामध्ये रुपांतरण
  २. सौरपथदिवे
  ३. बायोगॅस संयंत्राचा वापर
  ४. वृक्ष लागवड
  ५. जलसंधारण

➢ पारदर्शकता व तंत्रज्ञानः-
  १. ग्रामपंचायतीचे सर्व अभिलेखे संगणीकरण
  २. संगणकीकरणाव्दारे नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या सुविधा
  ३. ग्रामपंचायतीचे संकेतस्थळ व सुधारित तंत्रज्ञानाचा वापर
  ४. आधार कार्ड
  ५. संगणक आज्ञावलीचा वापर

- ग्रामपंचायतीनी परिशिष्ट अ मध्ये स्वमुल्यांकन करुन त्यास ग्रामपंचायतीची मान्यता घेवून पंचायत समितीकडे प्रस्ताव सादर करावेत.
- प्राप्त झालेल्या ग्रामपंचायतीच्या स्वमुल्यांकनाच्या प्रस्तावापैकी अधिक गुण प्राप्त २५ % ग्रामपंचायतीची दुस-या तालुक्यातील तालुकास्तरीय तपासणी समिती क्रॉस तपासणी करेल.
- तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती असेल ती खालीलप्रमाणे.

**तालुका स्तरावरील तपासणी समिती**

| अ.न. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी/ सहा.गट विकास अधिकारी | **अध्यक्ष** |
| २ | विस्तार अधिकारी (आरोग्य) | सदस्य |
| ३ | विस्तार अधिकारी (कृषी) | सदस्य |
| ४ | कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा) | सदस्य |
| ५ | सहाय्यक लेखा अधिकारी | सदस्य |
| ६ | तालुका विस्तार अधिकारी (पंचायत) | सदस्य सचिव |

- तालुका स्तरीय तपासणी समितीने दुस-या तालुक्यातील २५ % सर्वाधिक गुण प्राप्त ग्रामपंचायतीची क्रॉस तपासणी करुन त्यांना गुणांकन देवून सदर ग्रामपंचायतीची यादी संबंधित पंचायत समितीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी देवून संबंधित ग्रामपंचायतीना कळवेल.
- सदर दिलेल्या यादीतील गुणांकनाबाबत हरकत असलेल्या ग्रामपंचायती आपला ठराव घेवून जिल्हा तपासणी समितीकडे विहीत मुदतीत अपील दाखल करतील.

**जिल्हा स्तरीय तपासणी समिती खालील प्रमाणे आहे.**

| अ.न. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर | **अध्यक्ष** |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य |
| ३ | जिल्हा कृषी विकास अधिकारी, जि.प.कोल्हापूर | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा),जि.प.कोल्हापूर | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता ( बांधकाम),जि.प.कोल्हापूर | सदस्य |
| ६ | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.कोल्हापूर | सदस्य |
| ७ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),जि.प.कोल्हापूर | सदस्य सचिव |

- जिल्हा स्तरीय तपासणी समिती गुणांकनावर हरकती आल्यास आवश्यकता वाटल्यास स्थळ पाहणी करुन अंतिम निर्णयानंतर प्रत्येक तालुक्यातील सर्वाधिक गुण प्राप्त ग्रामपंचायतीची "तालुका स्मार्ट ग्राम" म्हणून घोषित करेल.
- **तालुका स्मार्ट ग्राम म्हणून निवड झालेल्या ग्रामपंचायतीस रक्कम रु.१०.०० लक्ष रुपयाचे बक्षिस.**
- जिल्हा स्तरीय तपासणी समिती तालुका स्मार्ट ग्राम म्हणून निवड झालेल्या सर्व ग्रामपंचायतीचे पुनर्मुल्यांकन करुन पुनर्मुल्यांकनामधून सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीस जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून घोषित करेल.
- **जिल्हा स्मार्ट ग्राम महणून निवड झालेल्या ग्रामपंचायतीस रक्कम रु.४०.०० लक्ष रुपयाचे बक्षिस.**
- प्रथम स्तरावर तालुका स्मार्ट ग्राम म्हणून घोषित करण्यात आलेल्या ग्रामपंचायतीना प्रजासत्ताक दिनी  व व्दितीय स्तरावर जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून घोषित ग्रामपंचायतीना महाराष्ट्र दिनी पारितोषिक वितरण करण्यात येईल.

*******************************

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

ग्रामीण भागाचा सुयोग्य विकास करणेचे दृष्टीने उपलब्ध मानवी संपत्तीव्दारे ग्रामीण भागात टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण करीत असतानाच ग्रामीण भागात राहणाऱ्या व अंग मेहनतीची अकुशल कामे करणाऱ्या, मजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ पारीत केला असुन सदर कायद्यान्वये ग्रामीण भागातील कुटुंबाला १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्याची रोजगार हमी योजना, व केंद्राची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांची सांगड घालुन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात आणलेली आहे. या योजनेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र असे संबोधले जाते.

आपल्या जिल्हयात सदरची योजना दिनांक १ एप्रिल २००८ पासुन राबविण्यास सुरूवात झाली. अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे बरोबरच ग्रामीण भागातील सार्वजनिक तसेच वैयक्तिक लाभाची कामे सुरू करून ग्रामीण भागातील योजनेंतर्गत दळणवळण सोयी, जलसिंचन सोयी, भुविकास कामे, स्त्रोत बळकटीकरण, जल संधारण इ. स्वरूपाची कामे हाती घेवून गावचा सर्वांगीण विकास करून ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावणे शक्य आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची ठळक वैशिष्ट्ये

- केंद्र शासनाव्दारे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५, ५ सप्टेंबर २००५ पासून लागु.
- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना २ फेब्रुवारी २००६ पासून महाराष्ट्रात लागु.
- देशातील ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबीयांना कमीतकमी १०० दिवसाच्या रोजगाराची हमी.
- कोल्हापूर जिल्हयात योजना तिसऱ्या टप्प्यात दि. ०१ एप्रिल २००८ पासून सुरू.
- ग्रामीण भागातील कुटुंबाना १०० दिवस केंद्र सरकारची रोजगाराची हमी शिवाय २६५ दिवस महाराष्ट्र राज्य शासनाची हमी.
- सर्व इच्छुक कुटुंबांच्या रोजगार पत्रिका (जॉब कार्ड) फोटोसहीत लॅमिनेटेड ओळख पत्र देणे.
- कामाची निवड, नियोजन व अंमलबजावणी करीता ग्रामसभेचा ठराव बंधनकारक.
- एकुण नियोजनाच्या किमान ५० % कामे ग्रामपंचायतीमार्फत राबविणे.

- संपुर्ण पारदर्शकता.
- सामाजिक अंकेक्षण करणे.
- शासन निकषाप्रमाणे किमान मजुरीची हमी.
- दिनांक १ एप्रिल २०१७ पासून मजुरीचा दर रू. २०१/- प्रति मनुष्यदिन.
- अर्ज केल्यापासुन १५ दिवसांत रोजगार पुरविणार.
- मजुरांची मजुरी १५ दिवसांत मजुरांच्या बँक खात्यावर e-fms प्रणालीव्दारे जमा केली जाते.
- कुटुंबातील प्रौढ व्यक्ति अर्जाव्दारे त्याचे सर्व कुटुंबातील व्यक्तिंची नावे नोंदणी करू शकतील.

**मग्रारोहयोच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाकरीता पुढील अधिकारी त्यांचे नावासमोर दिलेल्या पदनामानुसार घोषित करण्यात आलेले आहे.**

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त (महसुल) | विभागीय आयुक्त (महसुल) |
| २ | जिल्हाधिकारी | जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| ४ | उपजिल्हाधिकारी (रोहयो) | उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| ५ | उप विभागीय अधिकारी | उपविभागीय कार्यक्रम समन्वयक |
| ६ | तहसिलदार | कार्यक्रम अधिकारी |
| ७ | गट विकास अधिकारी | सह कार्यक्रम अधिकारी |

**योजनेंतर्गत प्रत्येक स्तरावरील कामे**

१) **ग्रामपंचायत स्तर :-** कुटुंबाचे / मजुरांचे नोंदणी करणे. मजुरांचे कामाची मागणी घेणे. कामे पुरविणे. ग्राम पंचायत मार्फत करावयाच्या कामाचे सर्व्हेक्षण करून अंदाजपत्रके करणे, कामाचे नियोजन करणे, कामाची अंमलबजावणी करणे, मजुरांना मजुरीसाठी निधी उपलब्ध करून देणे, वेळेवर मजुरी वाटप करणे, जॉबकार्डवर नोंदी घेणे तसेच सामाजिक अंकेक्षणाव्दारे ग्राम पातळीवर माहिती उपलब्ध करून देणे.

२) **तालुका स्तर :-** तालुक्यातील शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणा ग्राम पंचायतींना कामाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करणे, कामाचे नियोजन करून घेणे, निधीचा हिशोब

ठेवणे, शासनाला पाठवावयाची माहिती संकलीत करून जिल्हा स्तरावर पाठविणे. माहितीचे संकलन अद्यावत करणे.

३) **उप विभागीय स्तर :-** पंचायत समिती निहाय नियोजन मंजूर करून घेणे. तालुका स्तरावर अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे.

४) **जिल्हा स्तर :-** जिल्हयातील सर्व कामाचे नियोजन करून घेणे, निधीचा हिशोब ठेवणे, शासनाकडे आवश्यक ती माहिती पाठविणे, कामांचे सनियंत्रण करणे, या योजनेची जिल्हयाचे प्रमुख या नात्याने जी कामे करावी लागतील ती सर्व कामे करणे.

५) **आयुक्त स्तर :-** योजनेच्या सर्व कामांचे समन्वय, सनियंत्रण, पर्यवेक्षण, दक्षता व कामांचे नियोजन विहित नियमाप्रमाणे वेळेत करून घेणे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुज्ञेय कामे :-**

मनरेगा योजनेंतर्गत सार्वजनिक तसेच वैयक्तिक स्वरूपाची खालीलप्रमाणे कामे घेता येतील.

**मनरेगा योजनेंतर्गत सार्वजनिक तसेच वैयक्तिक स्वरूपाची कामे**

**१) जलसंधारण व जलसंवर्धन कामे-**

| | | |
|---|---|---|
| - मातीचे बांध | - वनराई बंधारा | - गाव तलाव |
| - दगडी बांध | - शेत तळे | - भुमिगत बंधारे |
| - ढाळीचे बांध | - मातीचे धरण | - वन तलाव |
| - कंपार्टमेंट बांध | - साठवण तलाव | - चिबड जमीन सुधार |
| - जैविक बांध | - पाझर तलाव | - भात खाचराची बांधबंधिस्ती इ. |
| - सलग समतल चर | - पाझर कालवे | - शेत बांध बंदिस्ती |

**२) दुष्काळ प्रतिबंध कामे-**

- पडीक जमीनीवर वृक्षलागवड
- रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड
- रोपवाटीका
- वृक्षलागवड व संगोपन
- जाळरेषांची कामे

**३) जलसिंचन कालव्यांची कामे-**

- मातीचे कालवे
- कालव्यांचे नुतनीकरण

४) अनु. जाती / जमाती नवीन भुधारक, इंदिरा आवास लाभार्थी, बी.पी.एल लाभार्थी / अल्प भुधारक इ. च्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणे. (सिंचन विहिर ,विहिर पुनर्भरण, शेततळे)

५) पारंपारीक पाणी साठयांचे, योजनेचे नुतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.

६) पुर नियंत्रण व पुर संरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात पाटचारी करणे.

७) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे, इतर जिल्हा रस्ते, गाव रस्ते , गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशानभुमी, प्राथमिक आरोग्य केंद्रे , शाळा व पाणीपुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, पांधण रस्ते, रस्त्यांचे नुतनीकरण , रस्ता रुंदीकरण करणे इ.

८) वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करणे तसेच अंगणवाडी / शाळांची शौचालय बांधणे.

९) क्रिडांगणाची कामे घेणे.

१०) नॅडॅप खत निर्मिती खड्डा , गांडूळ खत निर्मिती खड्डा, अमृतपाणी , अझोला खड्डा.

११) जनावारांचा गोठा , कुक्कुटपालन शेड, शेळीपालन शेड , Construction of pacca floor, Urine Tank and Fodder trough for cattle

१२) शोष खड्डे, पुनर्भरण खड्डे इ. कामे घेणे.

१३)पंतप्रधान आवास योजना/ रमाई / शबरी आवास योजनेतील घरकुलाचे नरेगा योजनेशी अभिसरणातून घरकुलांची अकुशल कामे घेणे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत  समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना

राज्यातील मजूरांना रोजगाराची शाश्वत हमी मिळावी या दृष्टीकोनातून रोजगार हमी योजना कार्यान्वीत करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून कामाची हमी दिल्याने महाराष्ट्र राज्याला देशपातळीवर मोठा गौरव प्राप्त झाला. केंद्र सरकारने ही योजना देशपातळीवर राबविण्याचा निर्णय घेवून सदर योजनेस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे नामकरण करणेत आले. ही केंद्र पुरस्कृत योजना सुरु झाल्यापासून इतर राज्ये या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्रापेक्षा सरस ठरली आहेत. ही योजना मजूरी देण्यापुरती सिमित न ठेवता त्यामधून वैयक्तीक लाभाची कामे मोठ्या प्रमाणावर घेवून कायम स्वरुपी टिकावू मत्ता निर्माण करणे, संबंधीत लाभार्थीस सक्षमपणे स्वाभिमानी जीवन जगून त्याचा सर्वांगिण विकास करणे हे महत्वाचे आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ (दि. ०६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसुची दोन मध्ये वैयक्तिक व सार्वजनिक कामांचा समावेश आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय दि. १ ऑक्टोबर २०१६ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे घेणेसंदर्भात समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना सुरू करणेत येत आहे. या योजने अंतर्गत खालील वर्गवारीतील वैयक्तिक व सार्वजनिक लाभाची ११ कामे मोहीम स्वरुपात प्राधान्याने सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | अहिल्यादेवी सिंचन विहीरी |
| २ | अमृतकुंड शेततळे |
| ३ | भू- संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग |
| ४ | भू- संजीवनी नाडेप कंपोस्टिंग |
| ५ | कल्पवृक्ष फळबाग लागवड |
| ६ | निर्मल शौचालय |
| ७ | निर्मल शोषखड्डे |
| ८ | समृद्ध गाव तलाव / समृद्ध जलसंधारणाची कामे |
| ९ | अंकुर रोपवाटीका |
| १० | नंदनवन वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण |
| ११ | ग्राम सबलीकरण समृद्ध ग्राम योजना (क्रिडांगणे / अंगणवाडी / स्मशानभूमी सुशोभीकरण / ग्रामपंचायत भवन / गावांतर्गत रस्ते / घरकुल / गुरांचा गोठा / कुक्कुटपालन शेड / शेळीपालन शेड / मत्स्यव्यवसाय ओटे ) |

**१. वैयक्तिक लाभाची कामे :-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम , १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची-दोन मधील परिच्छेद-४ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे वैयक्तिक लाभाची कामे देताना खालील प्रवर्गातील कुटूंबाना प्राधान्य देण्यात येईल.

- अनुसूचित जाती
- अनुसूचित जमाती
- भटक्या जमाती
- निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)
- दारिद्रयरेषेखालील इतर कुटूंबे
- स्त्री-कर्ता असलेली कुटूंबे
- शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्ती कर्ता असलेली कुटूंबे
- जमीन सुधारणांचे लाभार्थी
- इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी
- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) खालील लाभार्थी आणि - उपरोक्त प्रवर्गामधील पात्र लाभार्थींना प्राधान्य देण्यात आल्यानंतर , कृषि कर्जमाफी व कर्ज सहाय्य योजना, २००८ यामध्ये व्याख्या केलेल्या लहान व सीमांतभूधारक शेतकऱ्यांच्या जमीनीवरील कामांना, शर्तींच्या अधीनतेने प्राधान्य देण्यात येईल.

**वैयक्तिक स्वरुपाच्या कामांच्या लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज , जॉबकार्ड झेरॉक्स, ग्रामसभेचा लाभार्थी निवडीचा ठराव, जागेचा ८ अ व ७/१२ उतारा, आधार लिंकिंग केलेले बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ठळक झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, तलाठयाकडील समजुतीचा नकाशा इ. कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

## १.१ अहिल्यादेवी सिंचन विहीर

➢ **लाभार्थी पात्रतेचे निकष -**

✓ लाभार्थीस किमान ०.६० हे. सलग क्षेत्र असावे. (क्षेत्राची कमाल मर्यादा २ हेक्टर)

✓ प्रस्तावित विहिर व अस्तिवात असलेल्या विहिरीचे अंतर १५० मी पेक्षा जास्त असणे आवश्यक.

✓ प्रस्तावित विहिर व पिण्याचे पाण्याचे सार्वत्रिक स्त्रोत यातील अंतर किमान ५०० मी. पेक्षा जास्त असावे.

✓ प्रस्तावित विहिरीपासून ५ पोलच्या आत विद्युत पुरवठा नसल्यास ऑईल इंजिन लावणेबाबतचे हमीपत्र आवश्यक.

✓ लाभधारकाच्या ७/१२ वर विहिरीची नोंद असू नये.

✓ तलाठी यांच्या स्वाक्षरीचा एकूण क्षेत्राचा दाखला आवश्यक.

✓ एकापेक्षा अधिक लाभधारक संयुक्त विहिर घेवू शकतील मात्र त्यांचे एकत्रिक भूक्षेत्र ०.६० हे. पेक्षा जास्त व सलग असणे आवश्यक.

✓ विहिर लाभार्थी जॉबकार्डधारक असणे आवश्यक व मजूर म्हणून काम करून मजूरी घेणे आवश्यक.

➢ **विहिरीच्या खर्चाचे मापदंड-** विहिरींच्या बांधकामाची कमाल मर्यादा रू. ३.०० लाख.

○ अकुशल कुशल खर्चाचे ६० : ४० प्रमाण राखणे करीता मजूरी प्रधान काम घेणे आवश्यक उदा. भुसूधारक व वृक्ष लागवड इ. प्रकारची कामे. योजनेअंतर्गत करावयाच्या कामांचे अकुशल कुशल खर्चाचे ६० : ४० चे प्रमाण ग्रामपंचायत स्तरावर न ठेवता जिल्हा स्तरावर राखणेस मान्यता मिळालेली आहे.

○ प्रशासकीय मान्यता दिल्यापासून सलग दोन वर्षात विहिरीचे काम पूर्ण होणे अनिवार्य राहील.

○ या योजनेंतर्गत कंत्राटदार / ठेकेदार तसेच मजूर विस्थापित करणाऱ्या यंत्र सामग्री यांना बंदी राहील.

○ ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखडा व लेबर बजेट मध्ये सदर कामाचा समावेश असणे आवश्यक.

➢ **आकारमान-** व्यास ४.५० मी. , खोली १५ मी.

➢ **प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे-** तलाठयाकडील जातीचा दाखला, ८ अ उताऱ्यातील सर्व ७/१२ विहिर नसलेचा दाखला(तलाठी), तलाठयाकडील सामाईक विहिर हिस्सा नसलेला

दाखला, प्रस्तावित विहिर इतर खाजगी तसेच सार्वजनिक विहिरीपासून ५०० फुटापेक्षा जास्त अंतरावर असलेबाबत तलाठयाचा दाखला, लाभार्थी निवडीचा ग्रामसभा ठराव, पात्र विहिर लाभार्थीचा ग्रामसेवकाकडील दाखला, प्रस्तावित विहिरीमुळे संबंधित लाभार्थीचे सलग ६० गुंठे क्षेत्र ओलीताखाली येत असलेबाबत तलाठयाचा दाखला इ.

**१.२अमृतकुंड शेततळे-**

शासन निर्णय दि. १४ सप्टेंबर २०१५ व दि. १३ जूलै २०१६ अन्वये यंत्रणा व ग्रामपंचायतींना १० x १० x ३ मी., १५ x १० x ३ मी., १५ x १५ x ३ मी., २० x १५ x ३ मी., २० x २० x ३ मी., २५ x २० x ३ मी., २५ x २५ x ३ मी., ३० x २५ x ३ मी., ३० x ३० x ३ मी. अशा ९ विहित आकारमानाची शेत तळी नरेगा अंतर्गत **ग्रामपंचायतींमार्फत** देखील घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. शेततळी घेताना ग्रा.पं. ने राज्यशासनाचा कृषि विभाग अथवा लघूपाटबंधारे विभाग जि.प. यांची तांत्रिक मंजूरी घ्यावी.

**१.३ भू- संजीवनी व्हर्मी कंपोस्टिंग-**

नरेगा अंतर्गत शासन परिपत्रक दि. ०९ ऑक्टोबर २०१२ नुसार व्हर्मी कंपोस्टींग चे काम अनुज्ञेय आहे. शेतातील काडी कचरा , वनस्पतीजन्य पदार्थ , शेण यांचेपासून गांडूळांनी बनवलेल्या खताला गांडूळ खत किंवा व्हर्मी कंपोस्ट असे म्हणतात. विविध जिवाणू , संजिवके, व्हीटॅमिन आणि इतर उपयुक्त रसायने गांडूळ खतामध्ये असल्याने त्याचा पिकाच्या वाढीवर चांगला परिणाम होतो.

याप्रकारचे उत्तम प्रतीचे खत तयार करण्याकरीता कचरा, वनस्पतीजन्य पदार्थ आणि गांडूळांचा वापर केला जातो. गांडूळ खत तयार करण्यास शेडची उभारणी करताना सूर्यप्रकाश, थंडी आणि पाऊस या तिन्हीपासून गांडूळांचे रक्षण करण्यासाठी निवाऱ्याची गरज असते. त्यासाठी पाचटाचे छप्पर किंवा सिमेंट पत्र्याचे शेड असावे.

- खड्डयांचा आकार - ४.० मी. लांबी, १.१५ मी. रूंदी, ०.६० मी. उंची.
- मनरेगा अंतर्गत अनुज्ञेय रक्कम- रू. ११५२०/-
- इतर माहिती - गांडूळ खत पक्व होण्यासाठी ४० ते ६० दिवसांचा कालावधी लागतो.
  - एकावेळी १५० ते २०० किलो गांडूळ खताची निर्मिती होते.

## १.४ भू- संजीवनी नाडेप कंपोस्टिंग-

शेतातील कचऱ्यावर कंपोस्टिंग व्दारा प्रक्रिया केल्यास त्यातील सेंद्रिय पदार्थ जैविक पध्दतीने, सूक्ष्म जीव तसेच गांडुळांव्दारे कुजून त्यापासून उत्तम प्रकारचे ह्युमस सारखे सेंद्रिय कंपोस्ट खत तयार होते. या खताचा वापर शेतात मोठया प्रमाणात केला गेल्यास, जमिनीचे आरोग्यात विशेष सुधारणा होऊन, कृषि उत्पादनात फार मोठी भर पडेल.

शेतातून निघालेल्या सर्व वनस्पतीजन्य पदार्थांपासून सेंद्रिय खत तयार करून , परत शेतात टाकणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय खतामुळे जमिनीचा कस व जलधारणा शक्ती वाढून पोषक द्रव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात होतो. जमिन भूसभूशीत राहते. त्यामुळे जमिनीत हवा खेळती राहते. शेतात उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते.

- खड्डयांचा आकार - ३.६ मी. लांबी, १.५ मी. रूंदी, ०.९० मी. उंची.
- प्रति युनिट अपेक्षित खर्च - रू. १६४३३ /-
- मनरेगा अंतर्गत अनुज्ञेय रक्कम- रू. १०७४६/-
- इतर माहिती
  - नॅडेप कंपोस्ट खत पक्व होण्यासाठी ८० ते ९० दिवसांचा कालावधी लागतो.
  - एकावेळी २ ते २.५० टन कंपोस्ट खताची निर्मिती होते.
  - हे खत ०.२५ हे. क्षेत्रास पुरेसे आहे.
  - एका वर्षामध्ये ३ वेळा खत निर्मिती करणे शक्य होते.

## १.५ कल्पवृक्ष फळबाग लागवड-

दि. २९ जून २०११ व दि. २० जानेवारी २०१२ च्या शासन निर्णयान्वये फळबाग लागवडीकरीता मार्गदर्शक सुचना देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर फळबाग लागवडीची २४ प्रकारची फळझाडे , बांधावर २६ प्रकारची फळझाडे व पडीक शेतजमिनीवर २४ प्रकारच्या फळझाडांची लागवड निश्चित करण्यात आली आहे. याकरीता शासन निर्णय दि. ३० सप्टेंबर २०१६ अन्वये तांत्रिक व आर्थिक मापदंड दिलेले आहेत.

## १.६ निर्मल शौचालय-

नरेगा अंतर्गत शासन परिपत्रक दि. ०९ ऑक्टोबर २०१२ नुसार निर्मल शौचालयाचे काम अनुज्ञेय आहे. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या सुचना

मगांराग्रारोहयो आयुक्तालयाचे पत्र क्र. आयुक्तालय/पंचायत/१९२/२०१५ दि. ०३.०२.२०१५ अन्वये कळविणेत आले आहे. मनरेगा अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामाचा खर्च रू. १२०००/- इतका अनुज्ञेय आहे. शौचालयाचे बांधकाम स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या आराखडयाप्रमाणे (अंदाजपत्रके) राहील. तसेच शासन पत्र जा.क्र. संमुशा/१११६/प्र.क्र. २१ / ६२ दि. २४.११.२०१६ नुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) च्या पायाभूत सर्वेक्षणात समाविष्ट नसलेल्या व शौचालय नसलेल्या कुटुंबाना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक शौचालयाचा लाभ देता येईल.

## २. सार्वजनिक लाभाची कामे-

### २.१ निर्मल शोषखड्डे-

नरेगा अंतर्गत शासन परिपत्रक दि. ०९ ऑक्टोबर २०१२ नुसार वैयक्तिक निर्मल शोषखड्डयाचे काम अनुज्ञेय आहे. शोषखड्डा हे जमिनीखालील काम असून त्याव्दारे पाण्याचा जमिनीत निचरा होण्यास मदत होते.

- खड्डयांचा आकार - १.२ मी. लांबी, १.२ मी. रूंदी, १ मी. खोली.
- प्रति युनिट अपेक्षित खर्च - रू. ३५०० /-
- मनरेगा अंतर्गत अनुज्ञेय रक्कम - रू. २५६६/-
- इतर माहिती - पूर्वी निवळण केलेले पाणी (pre-settled waste water), न्हाणीघरातील पाणी वा इतर प्रकारचे पाणी (उदा.हातपंपातील पाणी) शोषखड्डयात सोडण्यात येते. सदर खड्डयातून पाणी आसपासच्या जमिनीत झिरपते. यामुळे पाण्याचा निचरा होण्याबरोबरच पाण्याचा पुनःवापर व जलस्त्रोताची शाश्वतता राहण्यासाठी मदत होते.

शासन पत्र दि. २८ मार्च २०१६ अन्वये शोषखड्डयाचे काम हे वैयक्तिक किंवा सार्वजनिक स्वरूपाचे काम म्हणून अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. ग्रामपंचायती मार्फत प्रत्येक जॉबकार्ड धारकाच्या घरासमोर शोषखड्डा घेवून शोषखड्डयांची कामे सार्वजनिक स्वरूपाचे काम गृहित धरून समूह पद्धतीने घेता येईल. शोषखड्डा हे काम एका घरासाठी एक याप्रमाणे राहील. एकत्रित समूह पद्धतीने सार्वजनिक स्वरूपाचे काम म्हणून घेता येईल.

**२.२ समृद्ध गाव तलाव / इतर समृद्ध जलसंधारणाची कामे**

**२.२.१ समृद्ध गाव तलाव**

**२.२.२ इतर समृद्ध जलसंधारणाची कामे**

**अ) पारंपारिक पाणीसाठयाचे नुतनीकरण व गाळ काढणे** - मनरेगा अंतर्गत गाव तलाव , पाझर तलाव व पारंपारिक पाणीसाठयामधील गाळ काढणे याबाबत दि. २२ मार्च २०११ , दि.२३ मार्च २०१६, दि. ३० जून २०१६ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. याकरीता आता सदर कामे ३० जून २०१८ पर्यंत घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

**१. पाणीसाठयाचे अनुज्ञेय प्रकार -**

अ) सर्व तलाव (लघु पाटबंधारे, पाझर तलाव, पारंपारिक तलाव)

ब) सर्व बंधारे

क) सर्व विहिरी (रोजगार हमी योजनेअंतर्गत घेतलेल्या विहिरी, पारंपारिक विहिरी, कृषि व पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व खाजगी विहिरी यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या विहिरींना प्राधान्य द्यावे.)

**२. मालकी -**

जिल्हा परिषद, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायती यांच्या मालकीच्या तसेच खाजगी मालकीच्या विहिरीतील गाळ काढण्यास अनुमती आहे.

**३. लघुस्तर -**

फक्त लघुपाटबंधारे स्थानिकस्तरा अंतर्गत ( ० ते १०० हेक्टर जिल्हा परिषद) (१०१ ते २५० स्थानिक स्तर ) ही योजना अनुज्ञेय राहील.

**४. गाळ काढण्याची कामे सर्वसाधारण परिस्थितीत घेण्याची परवानगी आहे. (टंचाईसदृश्य परिस्थिती नसतानां सुद्धा )**

**ब) समृध्द जलसंधारणाची कामे-** नरेगा अंतर्गत शासन परिपत्रक दि. ०९ ऑक्टोबर २०१२ नुसार सलग समपातळी चर, गुरे प्रतिबंधक चर, अनघड दगडी बांध, शेतबांध बंदिस्ती , माती नाला बांध , गॅबियन बंधारा, शेततळी इ. जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात घेण्यात यावीत.

**२.३ अंकुर रोपवाटीका-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दि. ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची-दोन मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड इत्यादीचा समावेश आहे. या कामासाठी सामाजिक वनीकरण/ वन विभाग कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून कार्यरत राहतील. शासन निर्णय क्र. मग्रारो - २०१६ / प्र.क्र.१०३ / मग्रारो-१ दि. २९ सप्टेंबर २०१६ अन्वये रोपवाटीका तयार करणेबाबत सुधारित तांत्रिक व आर्थिक मापदंड दिलेले आहेत.

२.४ **नंदनवन वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण-**

वन जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी वन विभाग कार्यान्वयीन यंत्रणा असून सार्वजनिक/शासकीय जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग आणि ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून भूमिका बजावित आहेत.

**२.५ ग्राम सबलीकरणाची समृद्ध ग्राम योजना**

(क्रिडांगणे / अंगणवाडी / स्मशानभूमी सुशोभीकरण / ग्रामपंचायत भवन / गावांतर्गत रस्ते / घरकुल / गुरांचा गोठा / कुक्कुटपालन शेड / शेळीपालन शेड / मत्स्यव्यवसाय ओटे )

२.५.१ **क्रिडांगणे-** शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल २०१३ अनुसार, तसेच जिल्हा क्रीडांगण योजनेबाबत शालेय शिक्षण व क्रीडाविभाग, शासन निर्णय दि. १३ फेब्रुवारी २०१३ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत क्रीडांगणाची कामे अभिसरणातून (Convergence) घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. एका गावात फक्त एकच क्रीडांगण अनुज्ञेय असेल. युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे राबविल्या जाणाऱ्या **पंचायत युवा क्रिडा व खेल अभियान (पायका)** योजनेअंतर्गत फुटबॉल, व्हॉलिबॉल, हॉकी, कबड्डी, यासारख्या खेळांसाठी यथेचित आकारमानाच्या निकषाला धरून क्रिडांगणाची कामे घेण्यात यावीत.

२.५.२ **अंगणवाडी-** महिला व बाल विकास विभागाच्या योजनेशी अभिसरण करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतींचे बांधकाम करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर २०१५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात

आलेल्या आहेत (नरेगा / एकात्मिक बाल विकास सेवा योजना - ICDS / राज्य निधी ). त्यास अनुसरून अंगणवाडी केंद्र इमारतींची बांधकामे घेण्यात यावीत.

अंगणवाडी केंद्र इमारतीच्या बांधकामातील अकुशल खर्च संपूर्णपणे नरेगा अंतर्गत भागविण्यात यावा. साहित्यावरील खर्च ज्यामध्ये कुशल कामगार मजुरी समाविष्ट आहे हा खर्च नरेगा अंतर्गत अनुज्ञेय (४० %) खर्चामधून व उर्वरित ६० % खर्च महिला व बालविकास विभागाच्या नियमित निधीमधून / एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागाच्या निधीमधून भागविण्यात यावा.

अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम हे इतर योजनांशी अभिसरण करून करावयाचे असल्याने सदर कामासाठी कार्यान्वित यंत्रणा पंचायत समिती स्तरावरील बांधकाम विभागाची राहील.

२.५.३ **स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरण-** महाराष्ट्र रोजगार अधिनियम १९७७, (दिनांक ६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची- २ मध्ये प्रवर्ग-ड : ग्रामीण पायाभूत सुविधा- अंतर्गत स्मशानभूमीचे बांधकाम करण्याचे काम अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.

स्मशानभूमी सुशोभीकरण अंतर्गत स्मशानभूमी ओटा व शेड याचे बांधकाम तसेच स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता, स्मशानभूमीचे कुंपन आणि स्मशानभूमीमध्ये योग्य त्या ठिकाणी बांधकामाच्या जागा वगळून वृक्ष लागवडीचे कामे करण्यात यावीत.

२.५.४ **ग्रामपंचायत भवन-** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७, (दिनांक ६ ऑगस्ट २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची- २ मध्ये प्रवर्ग-ड : ग्रामीण पायाभूत सुविधा- अंतर्गत ग्रामपंचायत भवन बांधणे अनुज्ञेय आहे. त्यास अनुसरून संदर्भाधीन शासन पत्र दिनांक २१ सप्टेंबर, २०१० अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

२.५.५ **घरकुल-** पंतप्रधान आवास योजना / रमाई आवास योजना/ शबरी आवास योजना इ. योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या कामामधील अकुशल स्वरूपाची कामे उदा. घरकुलाच्या जोत्यापर्यंतचे बांधकाम, जोत्यापासून ते सज्जापर्यंतचे बांधकाम, सज्जापासून ते छतापर्यंतचे बांधकाम तसेच छताची बांधकामे व घरकुलाची संपूर्ण कामे पूर्ण होईपर्यंत इत्यादी अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यास शासन निर्णय दिनांक ३० मे, २०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मगांराग्रारोहयो

२.५.६ आयुक्तालयाने पत्र क्र. आयुक्तालय/पंचायत/१२३०/२०१५ दि. ०८.०७.२०१५ अन्वये घरकुल बांधकाम करताना अकुशल कामे (९० मनुष्य दिवस / डोंगरी भागात ९५ मनुष्य दिवस) करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

**घरकुल बांधकामाचे मुख्य टप्पे**

| टप्पे | बांधकाम | मनुष्यदिन | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | डोंगराळ |
| पहिला टप्पा | पाया खोदकाम ते जोत्यापर्यंत बांधकाम | २८ | ३० |
| दुसरा टप्पा | जोत्यापासून ते सज्जापर्यंत बांधकाम | २४ | २५ |
| तिसरा टप्पा | सज्जापासून ते छतापर्यंत बांधकाम | १० | १० |
| चौथा टप्पा | छतापासून ते संपूर्ण घरकुल बांधकाम | २८ | ३० |
| | **एकूण बांधकाम** | **९०** | **९५** |

२.५.७ **गावांतर्गत रस्ते-** ग्रामीण भागात शेतरस्ते, पाणंद रस्ते दळणवळणासाठी आवश्यक आहेत. या कामांमध्ये मजुरांना मोठया प्रमाणावर मजूरी मिळते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रस्त्यांची कामे अनुज्ञेय आहेत. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७, मधील अनुसूची- २ कलम ३ (चार) (दोन) अन्वये ग्रामीण पायाभूत सुविधा अंतर्गत रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणे आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्यांच्या जाळयाशी जोडणे, आणि गावामधील पार्श्वनाली व मोऱ्या यांसह अंतर्गत पक्के मार्ग बांधणे इ. रस्त्यांची कामे अनुज्ञेय आहेत. यासह खालील प्रकारची कामे घेता येतील.

**१.** अद्याप एकाही रस्त्यांची जोड देण्यात आलेली नाही अशा १०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्त्या, वाड्या, तांडे, पाडे इत्यादींना जोडणारे रस्ते.

**२.** शाळेकडे जाणारा, स्मशानभूमीकडे जाणारा, आरोग्य केंद्राकडे जाणारा, शेताकडे जाणारा, गावातील अंतर्गत रस्ते. योजनेमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांवर सनियंत्रण अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात येत आहे. रस्त्याचे काम सुरू करताना, आखणी करून देताना अतिक्रमणाबाबत अडचणी सोडविण्याकरिता कामाच्या स्थळावर संबंधित गावाच्या तलाठी / मंडळ अधिकारी (महसूल) यांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. आजुबाजूच्या शेतकऱ्याचे अतिक्रमण असल्यास त्याबाबत तलाठी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

२.५.७ **गाय - म्हैस यांच्याकरिता गोठयात पक्के तळ, गव्हाण आणि मूत्रसंचय टाके :-**

ग्रामीण भागामध्ये जनावरांच्या गोठयांची जागा ही सर्वसाधारणपणे ओबड धोबड व खाच खळगे असलेली असते. गोठे क्वचितच व्यवस्थितरित्या बांधले जातात. गोठयामध्ये जनावरांचे शेण व मूत्र पडलेले असते व त्यामध्येच जनावरे बसतात. पावसाळयाच्या दिवसात गोठयातील जमिनीस दलदलीचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे जनावरे विविध प्रकारच्या आजारांना बळी पडतात. गोठयातील ओबड धोबड जमिनीमुळे जनावरांपासून मिळणारे मौल्यवान मूत्र व शेण यांचा संचय करता न आल्याने ते वाया जाते.

जनावरांचे मूत्र व शेण हे एक उत्कृष्ट प्रकारचे सेंद्रीय खत असल्याने जनावराच्या गोठयातील जमीन सिमेंट कॉंक्रीटचा वापर करून पक्क्या स्वरूपात सपाटीकरण केल्यास जनावरांपासून मिळणारे मूत्र गोठयाशेजारील खड्डयामध्ये एकत्र जमा करून त्याचा शेतजमिनीची सुपिकता व उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी उपयोग करून घेता येईल.

बऱ्याच ठिकाणी जनावरांना चारा देण्यासाठी गव्हाणी नसतात. मोकळया जागेवर चारा टाकला जातो. या चाऱ्यावर बऱ्याचवेळा शेण व मूत्र पडल्याने जनावरे चारा खात नाहीत व चारा वाया जातो. हे टाळण्यासाठी जनावरांच्या गोठयामध्ये जनावरांना चारा व खाद्य देण्यासाठी गव्हाण बांधणे जरूरीचे आहे.

- पक्के भूक्षेत्र - ७.७ मी. लांबी, ३.५ मी. रूंदी (सिमेंट कॉंक्रीट)
- गव्हाण - ७.७ मी. X ०.२० मी. X ०.६५ मी.
- मुत्रसंचय टाके - २५० ली. क्षमता.
- क्षमता - ६ गुरे.
- प्रति युनिट अपेक्षित खर्च - रू. ३५००० /-
- इतर माहिती - यासाठी स्वत:ची जमिन असलेले लाभार्थी पात्र असतील. व लाभार्थ्याकडे ६ जनावरे असलेबाबतचा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा दाखला असणेआवश्यक.

२.५.८ **कुक्कुटपालन शेड (निवारा) -** परसातील कुक्कुटपालनामुळे ग्रामीण भागातील कुटूंबाना पूरक उत्पन्नाबरोबरच आवश्यक पोषक प्राणीजन्य प्रथिनांचा पुरवठा होतो. खेडयांमध्ये कुक्कुटपक्षांना चांगल्या प्रतीचा निवारा उपलब्ध नसतो. त्यामुळे कुक्कुटपक्षांचे आरोग्य खालावलेले असते. कुक्कुटपक्षांचे ऊन, पाऊस, परभक्षी जनावरे व वारंवार येणाऱ्या आजारापासून संरक्षण करण्यासाठी चांगल्या प्रतीचा निवारा

उपलब्ध असणे आवश्यक आहे. चांगल्या निवाऱ्यामुळे रात्रीच्या वेळी पक्षांचे, पिलांचे व अंडयांचे परभक्षी प्राण्यांपासून संरक्षण होण्यास मदत होते.

- शेडचा आकार - ३.७५ मी. लांबी, २.०० मी. रूंदी, क्षेत्रफळ- ७.५० चौ.मी.आखुड बाजूस २.२० मी. उंची.
- क्षमता - १०० पक्षी
- प्रति युनिट अपेक्षित खर्च - रू. ४०००० /-
- इतर माहिती - यासाठी स्वत:ची जमिन असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भुमिहिन कुटूंबांना प्राधान्य देण्यात येईल.

२.५.९ **शेळीपालन शेड (निवारा) -** शेळीपालन हा ग्रामीण भागातील अल्प उत्पन्न गटातील कुटूंबाच्या उपजीविकेचे महत्वाचे साधन आहे. शेळया - मेंढयांना चांगल्या प्रतीचे गोठे बांधून दिले तर जनावरांचे आरोग्य देखील चांगले राहील व वाया जाणारे मलमूत्र एकत्र गोळा करून शेतीमध्ये चांगल्या प्रकारचे सेंद्रीय खत म्हणून उपयोगात आणता येईल. यामुळे शेतीच्या सुपिकते बरोबरच शेती उत्पादन वाढीवर चांगला परिणाम होऊन उदरनिर्वाहा साठी मदत होऊ शकेल.

- शेडचा आकार - ३.७५ मी. लांबी, २.०० मी. रूंदी, क्षेत्रफळ- ७.५० चौ.मी. २.२० मी. उंची.
- क्षमता - १० शेळया
- प्रति युनिट अपेक्षित खर्च - रू. ३५००० /-
- इतर माहिती - यासाठी स्वत:ची जमिन असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भुमिहिन कुटूंबांना प्राधान्य देण्यात येईल.

२.५.१० **मत्स्य व्यवसाय ओटे -** सार्वजनिक ठिकाणी मासे सुकविण्यासाठी ओटे बांधकाम करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ०९ ऑक्टोबर २०१२ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. मासे सुकविण्याकरिता १० मी. X १० मी. आकाराचा कॉंक्रीटचा ओटा तयार करण्यात यावा. ओटयाची उंची जमिनीवर कमीत कमी १५ से.मी. (६ इंच) इतकी ठेवावी.

************************

## जिल्हा ग्राम विकास निधी

- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १३३ नुसार प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा ग्राम विकास निधी गठित केलेला आहे.
- मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने तिच्या मागील वित्तीय वर्षातील उत्पन्नाचे रु.०.२५ टक्के अंशदान म्हणून जिल्हा ग्राम विकास निधी जमा करणेची तरतूद आहे. सदर रक्कमेवर द.सा.द.से. २.५०% व्याज दिले जाते.
- ग्रामपंचायतीकडून अंशदान म्हणून प्राप्त झालेल्या निधीतून पंचायतींना अधिनियमातील अनुसुची ४५ (१) मध्ये निर्दिष्ट केलेली विकास कामे पार पाडणेसाठी ग्रामपंचायतीचे विद्यमान आर्थिक स्थिती व परत फेडीची क्षमता विचारात घेवून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ७५% रक्कम कर्ज मंजूर करता येते.
- ग्रामपंचायतीकडील कर्ज प्रस्तावास रु.३० हजार पर्यंत मंजूर करणेचे अधिकार स्थायी समितीस व रु.३० हजारावरील कर्ज मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेस आहेत.
- ग्रामपंचायतीकडील मंजूर कर्ज रक्कम १० हप्त्यामध्ये १० वर्षामध्ये कर्जाची परत फेड केली जाते. सदर कर्जावर द.सा.द.शे. ५% दराने व्याज आकारणी केली जाते. ज्या ग्रामपंचायती कर्जाची परतफेड वेळेत करत नाहीत त्यांचेकडून थकीत रक्कमेवर द.सा.द.से. २% दराने दंडाची आकारणी केली जाते.

*******************

# "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) प्रकल्प अंमलबजावणी"

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायती राज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा-दाखले त्यांच्या रहिवास क्षेत्रात कालबध्द स्वरुपात मिळणे,तसेच इतर व्यावसायिक सेवा, जास्तीत जास्त प्रकारच्या बँकिंग सेवा (सर्व G२C व B२C सेवा) ग्रामिण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्यात या हेतूने महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष,दिनांक- ११ ऑगस्ट,२०१६ अन्वये राज्य शासनाचे ग्रामविकास विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय व CSC-SPV (Common Services Centres- Special Purpose Vehicle) या केंद्र शासनाद्वारे प्रेरित कंपनीच्या माध्यमातून राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये **"आपले सरकार सेवा केंद्र (ASSK) "** हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

"आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) या प्रकल्पामुळे पंचायती राज संस्थांचा कारभार संगणकीकृत होऊन ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसुत्रता व पारदर्शकता आणणे शक्य होईल.तसेच ग्रामपंचायतीद्वारे देण्यात येणारी G२C सेवा नागरिकांना आता आपले सरकार सेवा केंद्रामार्फत उपलब्ध होतील.शासनाच्या इतर विभागांतर्गत देण्यात येणा-या सेवा तसेच ग्रामीण नागरिकांना आवश्यक असलेल्या इतर व्यवसायिक सेवा (शासन सेवांव्यतिरिक्त) उदा. रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज,बँकिंग सेवा, आर्थिक समावेशन, ई-कॉमर्स,पॅनकार्ड,आधार नोंदणी,विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, ईलेक्ट्रीसिटी बील , पोस्ट विभागाच्या सेवा इ.सेवा सुध्दा या केंद्रावर उपलब्ध करून देऊन सदर केंद्र भविष्यात स्वयंपूर्ण (Self-Sustainable) बनण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

- **ग्रामपंचायत स्तरावर "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) उभारणे.**

१. ज्या ग्रामपंचायतींचे अंदाजपत्रकाची / उत्पन्न (येथे उत्पन्न म्हणजे ग्रामपंचायतींचे स्वत:चे उत्पन्न + १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी + आदिवासी विभागाकडून प्राप्त निधी व इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना संपूर्ण अधिकार आहे, असे समजण्यात यावे.) सर्वसाधारणपणे रु.१५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा ग्रामपंचायतीकडे किमान एक स्वतंत्र "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) उभारण्यात येईल.

२. या व्यतिरिक्त ज्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न १५ लाखापेक्षा कमी असून सुध्दा ग्रामपंचायतीला स्वतःचे स्वतंत्र "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) उभारायचे असेल व त्यासाठी सर्व आर्थिक जबाबदारी घेण्याची तयारी असेल,अशी ग्रामपंचायत याबाबत स्वच्छेने निर्णय घेऊ शकेल.

३. ज्या ग्रामपंचातयींचे उत्पन्न १५ लाखापेक्षा कमी आहे, आणि ज्यांनी स्वतंत्र "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) उभारण्याबद्दल स्वेच्छेने निर्णय घेतलेला नाही, त्यांना त्यांच्या भौगोलिक स्थळांनुसार एकत्रित करून ग्रामपंचायतींच्या क्लस्टर्सची (गट) निर्मिती करण्यात येईल व तेथे "आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) उभारण्यात येईल.सदर क्लस्टर तयार करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले असून हे क्लस्टर्स तयार करताना कोणत्याही एका क्लस्टरमध्ये एका गणापेक्षा अधिक गणांतील ग्रामपंचायतींचा समावेश असू नये याची दक्षता घ्यावी.तसेच क्लस्टरमध्ये पाच किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील ग्रामपंचायतीचा समावेश करू नये.ही सर्व बंधणे पाळताना सर्वच क्लस्टर्सचे एकूण एकूण उत्पन्न रु.१५ लाखापर्यंत आणणे शक्य नसल्यास या मर्यादेच्या जवळपास आणण्याचा प्रयत्न करावा.

- **आपले सरकार सेवा केंद्रातून देण्यात येणा-या सेवा.**

१. ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे संगणकीकरण (G२C) करणे.

२. ग्रामपंचायतींच्या लेखा संहिता २०११ मधील दैनंदिन कामकाजाचे १ ते ३३ नमूने संगणकीकृत करणे.

३. ई-पंचायत कार्यक्रामांतर्गत NIC आज्ञावली वापरणे.

| अ.क्र. | बाब | अ.क्र. | बाब |
|---|---|---|---|
| १ | नॅशनल पंचायत डिरेक्टरी/लोकल गर्व्हर्नमेन्ट डिरेक्टरी. | ७ | सर्विस प्लस. |
| २ | नॅशनल पंचायत प्रोफाईलर/एरिया प्रोफाइलर. | ८ | ट्रेनिंग मॅनेजमेन्ट |
| ३ | प्लॅन प्लस. | ९ | सोशल ऑडीट व मिटींग मॅनेजमेंट |
| ४ | प्रियासॉप्ट | १० | नॅशनल पंचायत पोर्टल |
| ५ | ॲक्शन सॉफ्ट | ११ | बेसिक GIS प्रणाली. |
| ६ | ॲसेट डिरेक्टरी | | |

- **आपले सरकार सेवा केंद्रातून देण्यात येणारे दाखले / प्रमाणपत्र (G२C) संगणकीकृत करणे व वितरीत करणे.**

| अ.क्र. | दाखले / प्रमाणपत्र | अ.क्र. | दाखले / प्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| १ | जन्मनोंदणी व प्रमाणपत्र | ११ | कोणत्याही योजनेचा फायदा घेतला नसल्याचे प्रमाणपत्र |
| २ | मृत्युची नोंदणी व प्रमाणपत्र | १२ | शौचालय दाखला |
| ३ | रहिवासाचा दाखला व प्रमाणपत्र | १३ | जॉब कार्ड |
| ४ | विवाहाचा दाखला | १४ | बांधकामासाठी अनुमती प्रमाणपत्र |
| ५ | नोकरी व्यवसायासाठी नाहरकत प्रमाणपत्र | १५ | नळजोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र |
| ६ | मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र | १६ | चारीत्र्याचा दाखला |
| ७ | मालमत्ता फेर प्रमाणपत्र /प्रत | १७ | निराधार योजनेसाठी वयाचा दाखला |
| ८ | नादेय प्रमाणपत्र | १८ | दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र |
| ९ | बेरोजगार प्रमाणपत्र | १९ | हयातीचा दाखला |
| १० | वीजेच्या जोडणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र | | |

- **आपले सरकार सेवा केंद्रांसाठी केंद्र चालक नियुक्त करणे .**

"आपले सरकार सेवा केंद्र " ( ASSK) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्रिपक्षीय करारनाम्यामध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी ही CSC-SPV कंपनीची असून नियुक्त केलेल्या मनुष्यबळाची संपूर्ण वैधानिक जबाबदारी (करार कायदयातील विविध तरतूदीच्य अधीन राहून) CSC-SPV कंपनीची असून कंपनीने करार पध्दतीने नेमलेल्या मनुष्यबळाला कोणत्याही प्रकारच्या शासकीय सेवेसाठी विचार करण्याचे शासनावर बंधनकारक राहणार नाही.

- **आपले सरकार सेवा केंद्रांसाठी दयावयाचा मोबदला.**

ज्या ग्रामपंचायतीमध्ये स्वतंत्र सेवा केंद्र आहे अशा प्रत्येक सेवा केंद्रासाठी दर महा रक्कम रुपये १०,४५०/- + १५% सेवा कर अशी एकूण रक्कम रुपये १२,०१८/- प्रमाणे प्रत्येक ग्रामंचायत जिल्हा स्तरीय निधीला प्रत्येक तीन महिन्याची आगाऊ रक्कम वर्ग करेल. व ज्या ग्रामपंचायती Clusters मध्ये समाविष्ट आहेत त्यांनी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रक्कम

विभागून , त्या प्रमाणे रक्कम राज्य स्तरीय निधीला वर्ग करावयाची असून रक्कम विभागून देण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी पूर्ण करावयाची आहे.

वरील प्रमाणे दरमहा दयावयाच्या रक्कम रुपये १०४५०/- ची विभागणी पुढीलप्रमाणे करणेत आलेली आहे.१) केंद्रचालकाचा मोबदला रक्कम रुपये ६०००/- , २) प्रति केंद्रासाठी लागणार प्रिंटर दुरुस्ती / बदली व कंझ्युमेबल्स इ. खर्च रुपये २७००/-, ३) प्रशिक्षण,राज्य , तालुका व जिल्हा पातळीवरील सहाय्यासाठी रु. १३००/- , ४) कंपनी व्यवस्थापन फी रक्कम रुपये ४००/-

- **आपले सरकार सेवा केंद्रांसाठी दयावयाचा मोबदला - निधीची उपलब्धता.**

१४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीच्या १० % प्रशासकीय निधीमधून या प्रकल्पासाठी खर्च करु शकतील.तथापी सदर निधी अपूरा पडल्यास उर्वरीत खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या ९०% अनुदानातून किंवा ग्रामपंचायत स्वनिधीतून / मुक्त निधीतून उपलब्ध करून दयावयाचा आहे.

- **कोल्हापूर जिल्हयात १०३० ग्रामपंचायतीमध्ये ७१६ आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन झालेली आहेत.**

| १५ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये स्वतंत्र स्थापन केलेल्या आपले सरकार सेवा **केंद्रांची एकूण संख्या** | १५ लाखाच्या आत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये स्वतंत्र स्थापन केलेल्या आपले सरकार सेवा **केंद्राची एकूण संख्या** | १५ लाखाच्या आत उत्पन्न असलेल्या परंतु क्लस्टर प्रमाणे स्थापन केलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची **एकूण संख्या** | आपले सरकार सेवा केंद्रांची **एकूण संख्या.** |
|---|---|---|---|
| **(स्वतंत्र केंद्र)** | **(स्वेच्छेने स्थापन झालेली केंद्र)** | **(२ किंवा त्यापेक्षा जास्त ग्रामपंचपायतींनी एकत्र येऊन स्थापन केलेली केंद्र-क्लस्टर)** | **एकूण** |
| **३३८** | **१४७** | **२३१** | **७१६** |

******************

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५

- या कायदयाला **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५** असे म्हणतात.
- दिनांक २८ एप्रील २०१५ रोजीच्या शासनाच्या अधिसुचनेनुसार ग्रामविकास विभागाने दिनांक १४ जुलै २०१५ रोजी शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.
- **कायदयाच्या महत्वाच्या तरतुदी**
  ग्रामपंचायत स्तरावर ग्रामस्थांना १३ सेवा विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.
  १.जन्म दाखला २. मृत्यु नोंद दाखला ३. विवाह नोंद दाखला ४.रहिवाशी दाखला ५.दारिद्र रेषेखालील दाखला ६.हयातीचा दाखला ७.ग्रा.पं.येणेबाकी दाखला ८.शौचालयाचा दाखला ९.न. नं.८ उतारा १०.निराधार असल्याचा दाखला ११. विधवा असल्याचा दाखला १२. परित्यक्ता असल्याचा दाखला १३. विभक्त कुटुंबाचा दाखला
- अ.न. १ ते ८ व अ.न.१० व ११ च्या सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.
- वरील सेवापैकी दारीद्र रेषेखालील दाखला, हयातीचा दाखला व निराधार असल्याचा दाखला या तीन सेवा मोफत देण्याची तरतुद.
- वरील अ.न.१ ते ९ सेवासाठी ५ दिवसाचा कालावधी व अ.न. १० ते १३ सेवासाठी २० दिवसाचा विहित कालावधी निश्चित केला आहे.
- वरील विहीत कालावधीत सेवा देणे बंधनकारक आहे.
- वरील विहीत कालावधीत सेवा न दिल्यास रु.५०० ते रु.५००० पर्यंत शास्तीची तरतुद आहे.
- पदनिर्देशित अधिकारी म्हणून ग्रामसेवक यांची नियुक्ती.
- प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून सहाय्यक गट विकास अधिकारी यांची नियुक्ती.
- व्दितीय अपिलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांची नियुक्ती.

*********************

# जैविक विविधता व्यवस्थापन समिती

जैविक विविधतेमध्ये पृथ्वीवरील सर्व सजीवांची विविधता समाविष्ट आहे.दि.५ जून १९९२ रोजी रिओ दि जानेरो येथे जैव विविधतेबद्दलच्या संयुक्त राष्ट्र संघ करारावर स्वाक्षरी झालेला भारत एक घटक पक्ष आहे.सदरचा करार दि.२९ डिसेंबर १९९३ पासून अंमलात आला आहे.त्याअनुषंगाने केंद्र शासनाने जैविक विविधता कायदा २००२ पारित केला आहे.त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने शासन अधिसूचना दि. १० डिसेंबर २००८ अन्वये महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ अधिसुचित केले आहेत.त्यानुसार पंचायत राज व्यवस्थेतील प्रत्येक स्थानिक संस्थेला जैविक विविधता व्यवस्थापन समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे.

**जैविक विविधता व्यवस्थापन समिती कार्ये :-**

१. समितीचे अधिकार क्षेत्रातील जैविक संसाधनाचे व त्याबाबतचे स्थानिक ज्ञानाच्या उपयोगातून प्राप्त होणा-या फायदयामधील भागीदारी सुनिश्चित करणे.
२. महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार समिती त्यांचे अधिकार क्षेत्रातील लोक जैविक विविधता नोंदवही तयार करील.हया कार्यासाठी जिल्हा तांत्रिक सहाय्यक गट तसेच समितीवरील निमंत्रित सदस्य जरूर ती तांत्रिक मदत करतील.
३. लोक जैविक विविधता नोंदवहीत समितीचे कार्यक्षेत्रात आढळणारी सर्व जैविक संसाधने त्याचा उपयोग त्याविषयीचे स्थानिक लोकांना असलेले ज्ञान इ.विषयीच्या माहितीचा समावेश असेल.
४. नोंदवहीतील जैविक संसाधनाचे वापराबाबत असलेल्या स्थानिक ज्ञानाची गुप्तता राखणे समितीस बंधनकारक राहील

महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८चे कलम २३(२),(३)व (४)नुसार सदर समितीवर ग्राम पंचायत त्याचे अधिकार क्षेत्रातील स्थानिक स्तरावरील विविध विभागाचे अधिकारी उपलब्धतेनुसार सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करेल.त्या अनुषंगाने समितीची रचना खालीलप्रमाणे

| अ.नं. | विभागातील पदाचे नांव | समितीमधील धारण केलेले पद | शेरा |
|---|---|---|---|
| १ | वन विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | सदर स्थापन झालेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समितीचा कार्यकाल हा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यकालाएवढाच राहील. |
| २ | कृषि विभाग (जलसंधारण विभाग) स्थानिक अधिकारी | सदस्य | |
| ३ | पशुसंवर्धन विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | |
| ४ | आरोग्य विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | |
| ५ | मत्स्यव्यवसाय विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | |
| ६ | शिक्षण विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | |
| ७ | आदिवासी विकास विभाग स्थानिक अधिकारी | सदस्य | |

सदर समितीचा अध्यक्ष समिती सदस्यामधून निवडण्यात यावा.याकरिता ग्रामसभा बैठक ग्रामपंचायत सरपंचाचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात यावी.**सदर समितीचे सदस्य सचिव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक हे राहतील.**

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

१. विधान सभेचे विद्यमान सदस्य (असल्यास)
२. लोक सभेचे विद्यमान सदस्य (असल्यास)

अशा प्रकारे जैविक विविधता व्यवस्थापन समितीची रचना असेल.त्यानुसार पंचायत समिती स्तरावर देखील उपरोक्त नमूद केलेप्रमाणे सदर समितीची रचना राहील.

जैविक विविधता कायदा २००२ ची पंचायत समिती स्तरावर, पंचायत राज व्यवस्थेतील प्रत्येक स्थानिक संस्था या ठिकाणी प्रभावीपणे अंमल बाजावणी होणेच्या दृष्टीने व मार्गदर्शक सुचना जाणून घेणेकरिता **सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra gov. in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१६०५०२१११०११३१२० असा आहे.**

********************

## सरपंच, उपसरपंच पदासाठीचे नामनिर्देशन पत्राचा नमुना

नमुना
नामनिर्देशन पत्र
(नियम ६ पहा)

**ग्रामपंचायतीच्या सरपंचाच्या/ उपसरपंचाच्या पदासाठी निवडणूक**

मी याव्दारे * --------------------------------- ग्रामपंचायतीचा सरपंच/ उपसरपंच यांच्या पदाच्या निवडणुकीसाठी ---------------------- यांना उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट करीत आहे.

उमेदवाराचे संपूर्ण नाव --------------------------------------------------------

उमेदवाराचा पोस्टाचा संपूर्ण पत्ता ----------------------------------------------

* ज्या विभागातून उमेदवार सदस्य म्हणून निवडून आला असेल त्या विभागाचे नाव.

* कलम १०, पोट-कलम (३) अन्वये उमेदवाराची नेमणूक करण्यात आली आहे.

सूचकाचे संपूर्ण नाव --------------------------------------------------------

दिनांक-

सूचकाची सही

### उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे असे प्रगट करत की, निवडून आल्यास मी --------------------------------- ग्रामपंचायतीचा सरपंच/ उपसरपंच म्हणून काम करण्यात तयार आहे.

दिनांक-

उमेदवाराची सही

ज्या तारखेस व ज्या वेळी नामनिर्देशनपत्र अध्यासी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात आले असेल ती तारीख व वेळ ----------------------

-------------------------------------------------------------------------------------------

### १ [नामनिर्देशनपत्र मिळाल्याची पावती
### (नामनिर्देशन पत्र सादर करणाऱ्या इसमास द्यावयाची)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक ------------------------------------------------------------ --------------- ग्रामपंचायतीच्या * सरपंचाच्या/ उपसरपंचाच्या निवडणुकीसाठीचे उमेदवार ----------------- यांचे नामनिर्देशनपत्र --------------- येथे (ठिकाण) ------------------- रोजी (तारीख) ------------------- वाजता (वेळ) माझ्या स्वाधीन करण्यात आले.

अध्यासी अधिकाऱ्याची सही

-------------------------------------------------------------------------------------------

* लागू नसलेला मजकुर खोडा

**मुंबई ग्रामपंचायत (राजीनाम्याची नोटीस देण्याबाबत) नियम १९६५**

**१ [नमुना १]**

(नियम ३ (२) पाहा)

**२ [ राजीनामा/ राजीनाम्याची नोटीस याचा नमुना]**

------------------------------------------------------------------------- यांस,

महोदय,

मी, याव्दारे दिनांक ----------------- पासून मध्यान्हपूर्व/ मध्यान्होत्तर ------------------- या पदाच्या २ [राजीनाम/ राजीनाम्याची नोटीस] देत आहे.

आपला,

| | |
|---|---|
| ठिकाण ------------------- | (सही)------------------------- |
| दिनांक -------------------- | (पदनाम) --------------------- |

पुढील इसमांच्या समक्ष सही केली.

| | | |
|---|---|---|
| १. | -------------------------------- | ----------------------------------- |
| | साक्षीदाराचे पूर्ण नाव व पत्ता (ग्रा.पं. सदस्य) | साक्षीदाराची सही |
| २. | -------------------------------- | ----------------------------------- |
| | साक्षीदाराचे पूर्ण नाव व पत्ता (ग्रा.पं. सदस्य) | साक्षीदाराची सही |

---

२[अनावश्यक मजकूर खोडावा]

(नमुना २)

[नियम ३ (३) पाहा]

२[ राजीनामा/ राजीनाम्याची नोटीस देणाऱ्या इसमास द्यावयाची किंवा पाठवावयाची पोच]

-------------------- यांनी धारण केलेल्या -------------------- २[पदाचा * राजीनामा/ राजीनाम्याची नोटीस] मला डाक नोंदणीने/ जातीने उक्त ------------- यांनी , योग्यरितीने १ [लेखी] प्राधिकृत केलेले ----------------- यांच्या मार्फत दिली.

दिनांक-

२[ राजीनामा/ राजीनाम्याची नोटीस घेणाऱ्या प्राधिकाऱ्याची सही व पदनाम

**ग्रामपंचायत मासिक सभा**
**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (कलम ३६ )**

१. प्रत्येक ग्रामपंचायतीची सभा प्रत्येक महिन्यात एकदा भरेल.

२. साधारण सभेकरिता ठरविलेल्या तारखेच्या किमान ३ दिवस अगोदर व खास सभेकरिता निश्चित केलेल्या १ दिवस अगोदर सचिवाने तारीख, वेळ आणि ठिकाण तसेच सभेत चालवावयाचे कामकाजाचा अजेंडा सरपंचाच्या मान्यतेने सर्व सदस्यांना पाठविला पाहिजे. त्याची स्वाक्षरीची पोहोच दप्तरी ठेवणे आवश्यक आहे.

३. सभेची नोटीस पंचायतीच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर लावली पाहिजे.

४. प्रत्येक सभा ग्रामपंचायतीच्या कार्यालयात किंवा गावातील चावडीत भरविण्यात आली पाहिजे.

५. प्रत्येक सभा नोटीस ज्या सदस्यास उद्देशून असेल त्या सदस्याच्या स्वाधीन करुन किंवा त्यास देऊन किंवा सदस्य समक्ष भेटत नसेल तर त्याच्या कुटुंबामध्ये राहणाऱ्या अन्य प्रौढ पुरुषाच्या स्वाधीन करुन किंवा त्यास देऊन बजावण्यात आली पाहिजे.

६. उपस्थित प्रौढ पुरुष व्यक्तीने नोटीस घेण्यास नकार दिला असेल तर त्याबाबतीत दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत, ज्या घरात ती व्यक्ती सामान्यपणे राहत असेल त्या घराच्या बाहेरील दरवाजावर किंवा तेथील दुसऱ्या एखाद्या ठळक जागेत चिकटवून ती नोटीस बजावण्यात येईल.

७. सरपंच आणि त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच हा प्रत्येक सभेचा अध्यक्ष असेल.

८. सरपंच, उपसरपंच हजर नसतील तर एखाद्या सदस्यास सभेचा अध्यक्ष म्हणून निवडले पाहिजे.

९. जर सरपंच कोणत्याही वेळी हजर राहतील तर अध्यक्षपद धारण करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाने ती जागा रिकामी केली पाहिजे.

१०. सभेस गणपूर्ती पंचायतीच्या सदस्यांच्या एकुण संख्येच्या एक व्दितीयांश (१/२) सदस्यांची मिळून होईल.

११. सभेसाठी नेमलेल्या वेळेपासून ३० मिनीटांच्या आत सभेची गणपूर्ती झाली पाहिजे.

१२. कोरम अभावी तहकुब सभेची नोटीस पंचायतीच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात आली पाहिजे.

१३. उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांच्या संमंतीने कोणतीही सभा वेळोवेळी तहकुब करता येईल.

१४. अध्यक्षपद धारण करणाऱ्या इसमास चर्चेच्या कोणत्याही अवस्थेत सभेत बोलण्याचा अधिकार आहे.

१५. सभेत बोलताना अध्यक्षपद धारण करणाऱ्या इसमाने आपल्या जागेवर उभे राहिले पाहिजे.

१६. मते साधारणतः तोंडी किंवा हात वर करुन घेतली पाहिजेत. परंतु, उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्य तसे ठरवतील तर गुप्त मतदान पध्दतीने मते घेण्याचा अधिकार आहे.

१७. सभेस उपस्थित असलेल्या कोणत्याही सदस्यास त्याची इच्छा असेल तर त्यास मत देण्यापासून अलिप्त राहता येईल.

१८. गुप्त मतदान पध्दतीत प्रत्येक सदस्याने मत पत्रिकेवर सही न करता तीत आपले मत नोंदविले पाहिजे.

१९. पंचायतीच्या सभेपुढे कोणताही प्रस्ताव मांडण्याची ज्या सदस्यांची इच्छा असेल त्याने असा प्रस्ताव सभेच्या तारखेच्या किमान पूर्ण पाच (५) दिवस अगोदर सरपंचाकडे पाठविला पाहिजे.

२०. अध्यक्षस्थानी असलेल्या इसमाने मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन मिळण्याची आवश्यकता असणार नाही.

२१. समसमान मते पडली असल्यास त्या बाबतीत अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या इसमास दुसरे किंवा निर्णायक मत असेल आणि त्याने ते दिले पाहिजे.

२२. पंचायतीच्या सदस्यांच्या एकुण संख्येच्या २/३ पेक्षा कमी नाहीत इतक्या सदस्यांनी तसा ठराव संमत केल्याशिवाय पंचायतीच्या कोणत्याही ठरावात तो संमंत केल्यापासून ३ महिन्यांच्या आत फेरफार करता कामा नये.

२३. सभेत ज्या ठरावात फेरफार करण्याचे किंवा जो ठराव रद्द करण्याचे योजिले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरफार करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी मांडलेला प्रस्ताव नोटीशीत पूर्णपणे नमुद केलेला असला पाहिजे .

२४. जी सभा तहकुब करण्यात आली असेल त्या सभेतील अनिर्णीत कामकाजा व्यतिरिक्त इतर कोणतेही कामकाज, तहकुबीनंतर पुन्हा घेतलेल्या सभेत चालविता कामा नये.

२५. कोणत्याही सभेत चालवावयाचे कामकाज त्या दिवसाच्या कार्यक्रमात ज्या क्रमाने दाखल करण्यात आले असेल त्या व्यतिरिक्त इतर क्रमाने कोणतेही कामकाज चालविता येणार नाही.

२६. वित्तीय वर्षात दर महिन्याला पंचायतीची किमान एक सभा झाली नाही तर सरपंच किंवा त्याचे गैरहजेरीत उपसरपंच हा सरपंच किंवा उपसरपंच पदावर राहण्यास अपात्र ठरतो. तसेच सदर प्रकरणी सचिवाला जबाबदार धरणेत येते.

२७. पंचायतीच्या प्रत्येक सभेचे कामकाज बांधणी केलेल्या पुस्तकात लिहून ठेवले पाहिजे.

२८. कार्यवाहीच्या टिपणावर सरपंचाने/ उपसरपंचाने किंवा सभेत अध्यस्थानी असलेल्या इतर व्यक्तीने आणि हजर असलेल्या सदस्यांनी सही केली पाहिजे.

२९. पंचायतीच्या कोणत्याही सदस्यांस सर्व वाजवी वेळी उक्त कामकाजाची तपासणी करता येईल.

*********************

**मुंबई ग्रामपंचायत (सरपंच, उपसरपंच किंवा पंचायतीचा सदस्य यांचे पद रिकामे झाल्याची नोटीस देणेबाबत) नियम १९५९ [ क.१७६ (२) खंड (९) ]**

पंचायतीच्या चिटणीसाने सरपंच, उपसरपंच किंवा पंचायतीचा सदस्य यांचे पद रिकामे झाल्याची नोटीस असे पद रिकामे झाल्यापासून ७ दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्याला दिले पाहिजे. नोटीसीत पुढील तपशील असला पाहिजे.

१. रिकामे झालेल्या पदाची जागा.
२. जागा रिकामी झाल्याची तारीख.
३. जागा रिकामी होण्याचे कारण.
४. सदस्याचा पदावधी ज्या तारखेस संपत असेल ती तारीख.

******************************

## ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण
### [पंचायतींच्या लेख्यांची तपासणी (कलम १४०)]

१. लेखापरीक्षक पंचायतीच्या लेख्यांची तपासणी करुन लेखापरीक्षा टिपणीची प्रत दोन महिन्यांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती आणि पंचायतीकडे पाठविल.

२. लेखापरीक्षा टिपणी मिळाल्यावर पंचायतीने लेखापरीक्षा टिपणीत दाखवून देण्यात आलेले दोष किंवा नियमबाह्य गोष्टी दुरुस्त केल्या पाहिजेत व पंचायत समितीस तसे केल्याविषयी तीन महिन्यांच्या आत कळविले पाहिजे.

३. पंचायत समितीस सूचना किंवा स्पष्टीकरण मिळाल्यावर लेखापरीक्षा टिपणीत चर्चा केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात

अ) पंचायतीने दिलेली सूचना किंवा स्पष्टीकरण स्विकारु शकेल व तो आक्षेप सोडून देण्याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे शिफारस करु शकेल.

ब) पुढच्या लेखापरीक्षेत किंवा कोणत्याही आधीच्या तारखेस त्या बाबीचे पुन्हा अन्वेषण (करण्याची सूचना करु शकेल) अथवा

क) लेखापरीक्षा टिपणीत दाखवून दिलेले दोष किंवा नियमबाह्य गोष्टी किंवा त्यापैकी कोणतेही दोष किंवा नियमबाह्य गोष्टी काढून टाकण्यात किंवा सुधारण्यात आल्या नाहीत असा निर्णय देऊ शकेल.

४. पंचायत समितीकडून सुचना किंवा स्पष्टीकरण ग्रामपंचायतीकडे मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत ग्राम पंचायतीकडून उक्त बाबीची पूर्तता करुन पंचायत समितीकडे सादर केली पाहिजे. पोटकलम २ मध्ये उल्लेख केलेला तीन महिन्यांचा कालावधी संपल्याबरोबर पंचायत समिती आपल्या निर्णयाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवेल.

५. पंचायत समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर कायद्याविरुध्द दिसणारी कोणतीही बाब नामंजूर करता येईल. त्याबद्दल जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर त्या व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेल्या कोणत्याही तुटीच्या किंवा हमीच्या रक्कमेची व्याजाच्या रक्कमेसह संबंधित व्यक्तीस असा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ग्राम निधीत जमा करणेबाबत जिल्हाधिकारी यांना विनंती करतील.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला निर्णय मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत अशा आदेशाविरुध्द जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

**********